मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३२३ ■ गुरुवार, ०६ ऑगस्ट २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# क्रिडा महोत्सवाचे उद्घाटन

## धोंडे प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

**दैनिक युवक आधार**

**आष्टी मराठवाडा संपर्कप्रमुख मारुती सत्रे :** खेळामध्ये यश मिळवायचे असेल तर जागतिक पातळीवर रेकॉर्ड करणाऱ्या खेळाडूंचा आदर्श समोर ठेवावा असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी कडा येथे केले.

माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आनंद चॅरिटेबल शिक्षण संस्था व इतर संस्थांच्या शालेय विद्यार्थ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धांच्या निमित्ताने क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी

व्यासपीठावर सौ. दमयंतीताई धोंडे, महेश कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, युवा नेते अभयराजे धोंडे, सौ. पायलताई धोंडे, सौ. सविताताई धोंडे,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष काकासाहेब शिंदे, महेश कारखान्याचे व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप,चेअरमन राजेश धोंडे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे,कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती नामदेव धोंडे,रामराव खेडकर,





राजाबापु नलावडे, नानाभाऊ वाडेकर, हरिभाऊ जंजिरे, महेश कारखान्याचे संचालक बजरंग कर्डिले, अंकुश मुंढे, पांडुरंग गावडे व इतरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की,क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण भागात गुणवंत खेळाडू निर्माण होतील. खेळात विविध पातळीवर यश संपादन केल्यास वेगवेगळ्या ठिकाणी शासकीय विभागात नोकरीच्या भरपूर संधी आहेत. खेळात यश मिळवण्यासाठी जागतिक पातळीवर रेकॉर्ड करणाऱ्या खेळाडूंचा आदर्श विद्यार्थ्यांनी समोर ठेवावा. खेळात विविध पातळीवर खेळल्याने मिळालेल्या प्रमाणपत्रामुळे शासकीय विभागात वेगवेगळ्या पदावर चांगली नोकरी मिळू शकते. आपल्याला भविष्यात कोणत्या क्षेत्रात करिअर करायची आहे हे विद्यार्थ्यांनी आतापासूनच ठरवावे आणि त्या दृष्टीने तयारी करावी. यश मिळवायचे असेल तर वारंवार होणाऱ्या क्रीडा स्पर्धेत सहभागी व्हावे.

तसेच पालकांनी आपल्या मुला-मुलींना सकस आणि चांगला आहार द्यावा.

क्रीडा महोत्सवात आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील वेगवेगळ्या संस्थेतील हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते प्रारंभी कडा शहरातून क्रीडा ज्योतीची भव्य अशी रॅली काढण्यात आली होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. एच.जी. विधाते यांनी सांगितले की, संस्था अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त

**■ विद्यार्थ्यांनी जागतिक पातळीवर रेकॉर्ड करणाऱ्या खेळाडूंचा आदर्श समोर ठेवावा :- माजी आ. भीमराव धोंडे**

**■ खेळामध्ये यश मिळवायचे असेल तर क्रिडा स्पर्धेत वारंवार सहभागी व्हा :- माजी आ. भीमराव धोंडे**

महाविद्यालयात रक्तदान शिबिर, क्रीडा महोत्सव तसेच इतर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी या स्पर्धाचे आयोजन केले आहे.

माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आनंदराव धोंडे महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी महेश कारखान्याचे संचालक विधाते,बाबा वाघुले, सरपंच सावता ससाने, विठ्ठल लांडगे, मधुकर शिरोळे, राजू रासकर, बाळासाहेब भुकन, सुदाम झिंजुर्के,बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब पवार, नानाभाऊ वाडेकर, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. एस. एन. वाघुले,लिंबराज कर्डिले, सोनाजी गांजुरे, सरपंच माऊली वाघ, रामकिशन बुचुडे, बाबा ससाने, सरपंच सोमनाथ गायकवाड, प्रा. डॉ. बाळासाहेब धोंडे, माजी सभापती अनिल जायभाय, चेअरमन डॉ. शाम सांगळे, चेअरमन दादासाहेब हजारे, सेवानिवृत्त पीएसआय शेख व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य बापू खैरे, प्रा. विनोद ढोबळे यांनी केले. माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थी कार्यकर्ते व शिक्षकांनी त्यांना भरभरून अशा शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे दोन दिवसांपूर्वी कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात घेण्यात आलेल्या धोंडे प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धांचे बक्षीस वितरण याप्रसंगी करण्यात आले.

# दैनिक युवक आधारच्या नव्या मुद्रणालयाचा शुभारंभ; पहिल्या अंकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** दैनिक युवक आधारचे संस्थापक व संपादक संतोष आमले यांच्या नव्या अत्याधुनिक मुद्रणालयाला पत्रकार, सामाजिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सदिच्छा भेट देत त्यांच्या नव्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकार मित्र असोसिएशनचे संस्थापक केवल महाडिक, आमदार विक्रांतदादा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राहुलजी बोर्डे तसेच पत्रकार मित्र असोसिएशनचे कार्याध्यक्ष नितीनजी जोशी यांनी नव्याने सुरू करण्यात आलेल्या प्रिंटिंग मशिनची पाहणी केली. या अत्याधुनिक मशिनमधून दैनिक



युवक आधारचा पहिला अंक मुद्रित करण्यात आला आणि त्या पहिल्या अंकाचे उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते अनावरण करण्यात आले. या प्रसंगी उत्साहपूर्ण वातावरणात संतोष आमले यांचे अभिनंदन करण्यात आले. वृत्तपत्र मुद्रणाच्या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून संतोष आमले यांनी आपल्या कार्याची स्वतंत्र ओळख निर्माण केली असून, गुणवत्तापूर्ण मुद्रण आणि पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी विश्वासार्ह स्थान मिळविले आहे. त्यांच्या या नव्या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक करत आगामी काळातही त्यांच्या मुद्रणालयाची उत्तरोत्तर प्रगती व्हावी, अशा मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी पत्रकार मित्र असोसिएशन आणि आमदार विक्रांतदादा प्रतिष्ठानच्या वतीने संतोष आमले यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. विशेष म्हणजे, या व्यवसायात त्यांचा मुलगाही सक्रिय सहभाग घेत असून, आधुनिक मुद्रण व्यवस्थापनात तो मोलाचा हातभार लावत आहे. त्यामुळे ही यशस्वी परंपरा पुढील पिढीकडेही सक्षमपणे पुढे जात असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पुण्यात सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांची सदिच्छा भेट

## मराठी चित्रपटसृष्टीच्या प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते :** अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या सभासदांच्या तसेच मराठी चित्रपट व्यवसायाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांबाबत महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री मा. श्री. ॲड. आशिष शेलार यांची पुणे येथे सदिच्छा भेट घेण्यात आली. यावेळी चित्रपटसृष्टीसमोरील विविध अडचणी, सभासदांचे प्रश्न आणि उद्योगाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सविस्तर निवेदन मंत्री महोदयांना सादर करण्यात आले.

या भेटीदरम्यान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी निवेदनातील सर्व मुद्द्यांची



गांभीर्याने दखल घेतली. चित्रपट क्षेत्राशी संबंधित प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांची बैठक लवकरच बोलावण्यात येईल तसेच आवश्यक त्या सर्व स्तरांवर सकारात्मक प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी प्रतिनिधीमंडळाला दिले.

मराठी चित्रपटसृष्टीच्या विकासासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल आणि उद्योगाला आवश्यक ते सहकार्य करण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही मंत्री महोदयांनी यावेळी स्पष्ट केले.

या प्रसंगी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, उपाध्यक्ष धनाजी यमकर, सहकार्यवाह वासू पाटील तसेच विशाल पवार उपस्थित होतो. प्रतिनिधीमंडळाने मंत्री महोदयांचे वेळ देऊन सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल आभार मानले आणि मराठी चित्रपटसृष्टीच्या हितासाठी शासनाकडून लवकरच ठोस निर्णय होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आवाहनाला प्रतिसाद

# मुख्यमंत्री सहायता निधीस अभिजित जाधव व सत्यवान नाईक यांच्याकडून ५१ हजारांचा धनादेश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त बॅनर, होर्डिंग, पुष्पगुच्छ, केक तसेच इतर अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी कार्यासाठी योगदान देण्याचे केलेले आवाहन नागरिक, कार्यकर्ते आणि हितचिंतकांकडून उत्स्फूर्तपणे स्वीकारले जात आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत श्री. अभिजित जाधव व श्री. सत्यवान नाईक यांच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ५१ हजार रुपयांचा धनादेश आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

वाढदिवसाच्या निमित्ताने होणारा अनावश्यक खर्च टाळून तो गरजू आणि समाजाच्या हितासाठी उपयोगात आणणे हीच वाढदिवसाची खरी भेट असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो तसेच सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होते, असेही यावेळी सांगण्यात आले. वाढदिवस साजरा करताना अनावश्यक खर्चाला फाटा देऊन रक्तदान, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे, स्वच्छता मोहीम तसेच गरजू नागरिकांना मदत अशा समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देण्याचे आवाहनही करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या या आवाहनाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त समाजहिताची परंपरा अधिक बळकट करण्यासाठी अनेक कार्यकर्ते, नागरिक आणि हितचिंतक पुढाकार घेत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वाढदिवसाच्या उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देण्याचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवेशमार्गाचीही दुरवस्था

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** शहरांतून जाणारे सर्वच महामार्ग खड्डेग्रस्त झाले आहेत.यात नवल वाटण्या सारखे काही नसले तरीनवलाची गोष्ट मात्र नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू झाली असताना या विमानतळाकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांचीही अवस्था दयनीय आहे. विमानतळाचा प्रवेशमार्ग असलेल्या उलवे-बेलापूर मार्गासह शीव-पनवेल महामार्ग आणि ठाणे-बेलापूर मार्गावर पावसामुळे मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.हेच नवलाईची खरी गोष्ट आहे. मुंबई, ठाणे, रायगड, जेएनपीए बंदर, औद्योगिक पट्टा आणि विमानतळाला



जोडणाऱ्या महत्त्वाच्या मार्गांवरील दुरवस्था आता केवळ वाहतुकीचा प्रश्न न राहता सुरक्षिततेचाही गंभीर विषय बनली आहे.

नवी मुंबईतील प्रमुख महामार्गांवर दररोज लाखो वाहनांची ये-जा होते. यामध्ये विमानतळावर जाणारे प्रवासी, कंटेनर वाहतूक, अवजड मालवाहू वाहने, खासगी बस, सार्वजनिक वाहतूक तसेच दुचाकीस्वारांचा समावेश आहे. मात्र पावसाळा सुरू होताच या महामार्गांवर मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवास अधिकच धोकादायक बनला आहे. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही. परिणामी अचानक ब्रेक लावणे, वाहनांचे संतुलन बिघडणे आणि किरकोळ अपघातांची मालिका सुरूच आहे. सर्वाधिक गंभीर परिस्थिती शीव-पनवेल महामार्गावर आहे.

नवी मुंबईचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐरोली टोल नाक्यापासून ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापर्यंतही खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करून मार्ग काढावा लागत आहे. ठाणे-बेलापूर मार्गाची परिस्थितीही काही वेगळी नाही.

नवी मुंबईतील औद्योगिक पट्टा, ट्रान्सपोर्ट हब आणि जेएनपीए बंदराकडे जाणाऱ्या हजारो अवजड वाहनांचा हा प्रमुख मार्ग आहे. अनेक ठिकाणी डांबरीकरण उखडल्याने रस्त्यात खड्डे पडले असून, मोठ्या वाहनांमुळे ही अवस्था दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत आहे.

# 'कँडेरे हुरुन इंडिया वुमन लीडर्स लिस्ट 2026' सादर

## उद्योग जगतावर अधिराज्य गाजवणाऱ्या 10 ज्येष्ठ महिला उद्योजिका; स्वतःच्या बळावर उभी केली साम्राज्ये

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी** : कल्याण ज्वेलर्सचा ब्रँड कँडेरे आणि हुरुन इंडियाने २०२६ कँडेरे हुरुन इंडिया वुमेन लीडर्स लिस्टचे अनावरण केले. कँडेरे हुरुन इंडियाचे पाच स्तंभ संस्कृती, संपत्ती निर्मिती, मूल्य निर्मिती, स्टार्टअप्स आणि प्रभाव यांवर आधारित १२ श्रेणींमध्ये लक्षणीय योगदान देणाऱ्या भारतातील ११७ असाधारण महिलांचा सन्मान केला. कँडेरे हुरुन इंडिया वुमन लीडर्स लिस्ट 2026 भारतीय महिला जागतिक स्तरावर, विशेषतः व्यावसायिक लीडर म्हणून ओळखल्या जात आहेत आणि या महिलांची ओळख वयाच्या पलीकडची आहे. कँडेरे हुरुन इंडिया वुमन लीडर्सच्या 2026 च्या नवीन यादीतील व्यावसायिक महिलांचा प्रभाव वाढत्या वयासोबत अजिबात कमी झालेला नाही.

महिला उद्योजिका: 66 वर्षीय महिलांपासून ते उद्योगातील 81 वर्षांच्या अनुभवी नेत्यापर्यंत भारतातील अत्यंत अनुभवी महिला नेतृत्व देशातील काही सर्वात मोठ्या कंपन्यांचे प्रमुखपद भूषवत आहेत. 'कँडेरे हुरुन इंडिया वुमन लीडर्स लिस्ट 2026' या लिस्टमध्ये विविध पिढ्यांमधील यशस्वी महिलांचा समावेश आहे. यामध्ये 19 वर्षीय पॅरा-आर्चरपासून ते 86 वर्षीय उद्योजिकेचा समावेश आहे, ज्या आजही आपल्या कंपन्यांचे नेतृत्व करत आहेत.

टॉप -10 महिला उद्योजिका 65 वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या असून सुमारे 4.3 लाख कोटींच्या एकूण बाजार भांडवलाच्या कंपन्या चालवतात. रिलायन्सचे अध्यक्ष मुकेश अंबानींच्या विहीणबाई स्वाती पिरामल यांचाही या यादीत समावेश असून विशेष म्हणजे या




महिलांना व्यवसायाचा वारसा नाही मिळाला तर स्वतःच्या बळावर स्वतःची साम्राज्ये उभी केली.

कँडेरे हुरूनच्या या लिस्टमध्ये सर्वात वयस्कर महिला उद्योजकांच्या यादीत टॉप-3 मध्ये अपोलो हॉस्पिटल्स एंटरप्राइजच्या 68 वर्षीय प्रीथा रेड्डी आणि 67 वर्षीय सुनीता रेड्डी दुसऱ्या क्रमांकावर ज्या 1,21,770 कोटींचा व्यवसाय सांभाळतात. तसेच या लिस्टमध्ये पिरामल ग्रुपच्या 70 वर्षीय स्वाती पिरामल तिसऱ्या क्रमांकावर असून त्यांच्या कंपनीचे मूल्यांकन 85,850 कोटी रुपये आहे.

भारतातील सर्वात वयस्कर महिला व्यावसायिक लीडर्सच्या लिस्टमध्ये पुढे बायोकॉनच्या 73 वर्षीय किरण मजूमदार-शॉ 67,440 कोटींच्या कंपनीचे नेतृत्व करत आहे. तसेच सेल्सफोर्स इंडियाच्या 79 वर्षीय अरुंधती भट्टाचार्य 45,940 कोटींच्या बाजार भांडवलासह 5व्या क्रमांकावर असून पहिल्या 10 महिलांच्या लिस्टमध्ये गॉडफ्रे फिलिप्स इंडियाच्या प्रमुख 81 वर्षीय बिना मोदी यांचाही समावेश आहे, ज्यांच्या कंपनीचे मूल्यांकन 34,930 कोटी रुपये आहे.

याशिवाय या लिस्टमध्ये पुढे 69 वर्षांच्या USV च्या लीना गांधी तिवारी सातव्या क्रमांकावर असून 32,460 कोटींच्या कंपनीचे नेतृत्व करत आहेत. 22,990 कोटींचे बाजारमूल्य असलेल्या TAFE या ट्रॅक्टर आणि कृषी उपकरण कंपनीच्या प्रमुख 66 वर्षीय मल्लिका श्रीनिवासन यादीत आठव्या स्थानावर असून नवव्या क्रमांकावर सुड-केमी इंडियाच्या 66 वर्षीय अर्शिया ए लालजी तर, दहाव्या स्थानावर जेके लक्ष्मी सिमेंटच्या 74 वर्षीय विनिता सिंघानिया आहेत, ज्या 7410 कोटींच्या कंपनीचे व्यवस्थापन करतात.

श्री.संजय रघुरामन, व्यवस्थापकीय संचालक, कँडेरे म्हणाले,"गेल्या वर्षी जेव्हा आम्ही कँडेरे-हुरुन इंडिया वुमेन लीडर्स लिस्ट लाँच करण्यासाठी हुरुन इंडियासोबत सहयोग केला, तेव्हा ज्यांचे नेतृत्व, यश आणि प्रभाव भारताला अर्थपूर्ण मार्गाने आकार देतात अशा महिलांचा उत्सव साजरा करणारा एक वार्षिक सन्मान प्रस्थापित करणे हे आमचे ध्येय होते. हे दुसरे एडिशन सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे, ज्यामध्ये विविध क्षेत्रांमध्ये नवीन मानके प्रस्थापित करणाऱ्या नेत्यांच्या आणखी एका उल्लेखनीय समूहाचा सन्मान करण्यात आला आहे. हुरुन इंडियासोबत, आम्हाला आशा आहे की, हा सन्मान अधिक प्रतिष्ठित होत राहील."

भारतातील कॉर्पोरेट क्षेत्राला आकार देण्यात या अनुभवी महिलांचे योगदान कँडेरे हुरुन इंडिया वुमन लीडर्स या लिस्टमधून समोर येते. ज्येष्ठ श्रेणीतील सर्वात तरुण महिला व्यावसायिक नेत्या 66 वर्षांच्या, तर सर्वात वयस्कर 81 वर्षांच्या असून या यादीत आरोग्यसेवा, औषधनिर्माण, उत्पादन, तंत्रज्ञान, सिमेंट आणि एफएमसीजी (FMCG) यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये नेतृत्व करणाऱ्या महिलांचा समावेश आहे.

---

# यू बिझनेस मिट यांच्यावतीने इंडो-थाई बिझनेस कॉरिडोर चे उद्घाटन

## क्रॉस बाँड्री बिझनेस संधी प्राप्त करण्याकरिता आणखीन एक पाऊल

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/ बेलापूर** : यू बिझनेस मिट आणि संलग्न संस्थांच्या वतीने नुकतेच नवी मुंबई ग्लोबल समिट चे आयोजन करण्यात आले होते. या नावीन्यपूर्ण उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर यू बिझनेस मिट यांच्यावतीने इंडो-थाई बिझनेस कॉरिडोर चे उद्घाटन सोमवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी बेलापूर येथील बी आर एस सी सी एल येथे करण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यवसाय संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रारंभ करण्यात आलेल्या संकल्पनेने मूर्त रूप धारण केले असून हे उद्घाटन म्हणजे या संकल्पनेची पुढली पायरी मानली जात आहे.

यू बिझनेस मिट चे संस्थापक वैभव सोनटक्के यांनी आपले सहकारी समृद्धी वाणी, पत्रकार विवेक पाटील, पत्रकार मंदार दोंदे आणि संलग्न संस्थांचे प्रमुख यांच्या उपस्थितीत इंडो-थाई बिझनेस कॉरिडोर ची निर्मिती केली आहे. एक्सपोर्ट इम्पोर्ट, मेडिकल टुरिझम, रिअल इस्टेट, ग्लोबल मिडिया, एंटरटेनमेंट इंडस्ट्री, मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री, क्लाऊड एंटरप्रेनरशिप, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, बँकिंग अँड फायनान्स, कन्स्ट्रक्शन अशा नानाविध क्षेत्रातील होतकरू आणि विजिगीशू वृत्तीच्या व्यावसायिकांना थायलंड देशाबरोबर व्यवसाय करण्याकरता हे कॉरिडोर अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे असे वैभव सोनटक्के



यांनी सांगितले.तसेच आगामी काळात मॉरिशस, दुबई आणि अमेरिका या देशांच्या समवेत क्रॉस बाउंड्री व्यवसाय करण्याकरता यू बिझनेस मीट पंख पसरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

इंटरनॅशनल बिझनेस कॉरिडोरचे उद्घाटन करत असतानाच यु बिझनेस मीट यांच्यावतीने कॉर्पोरेट बिझनेस सेंटर देखील सुरू करण्यात आले आहे. व्यवसाय संधी शोधणाऱ्या होतकरूंना अल्प शुल्कात कार्यालय या उपक्रमांतर्गत उपलब्ध करून देण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय व्यवसाय करत असणाऱ्या होतकरूंना येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाताना लीगल ॲडव्हाइस, सरकारी परवाने, आंतरराष्ट्रीय व्यवसाय करार आदी महत्त्वपूर्ण दस्तावेज बनवण्याकरता यु बिझनेस मिटने पुढाकार घेतला आहे.

या उद्घाटन सोहळ्याला निष्णात मानसोपचारतज्ञ आणि सेक्सोलॉजिस्ट डॉ राहुल भातांबरे,डॉ प्रियांका आशिष, सौंदर्य तज्ञ आणि फीजिओथेरपीस्ट,सेन्सिबल कनेक्ट सोल्युशन्स चे सर्वेसर्वा अमृत नेरळीकर,तेरणा हॉस्पिटलचे जनरल मॅनेजर डॉक्टर मनीष राय, यू बिझनेस मिट प्रतिनिधी केतकी पटवर्धन,जान्हवी पाटील,आय डी एफ सी बँकेचे पब्लिक रिलेशन्स आणि कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स प्रतिनिधी.यांची प्रमुख उपस्थिती होती.

थायलंड वरून पिटा मुख्य संचालक तथा थायलंड इंबसी ॲडव्हायझर प्रसर्त पियासाचादेश यांनी ऑनलाइन उपस्थित राहत उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. यु बिझनेस नीट च्या माध्यमातून भारत आणि थायलंड यांच्यातील व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची त्यांनी यावेळेस प्रशंसा केली. यु बिझनेस मिट च्या उपक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार,दैनिक महासागर संचालक तथा मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक , महाव्यवस्थापक रायगड दत्ता कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती होती. ज्येष्ठ आणि श्रेष्ठ असणारे श्रीकृष्ण चांडक हे शुभेच्छा देण्यासाठी खास नागपूरहून नवी मुंबई येथे आले होते. यू बिझनेस मिट चे संस्थापक वैभव सोनटक्के यांनी क्रॉस बाउंड्री बिझनेस ऑपॉर्च्युनिटी या विषयाबाबत उपस्थितांशी संवाद साधला. समृद्धी वाणी यांनी या संकल्पनेला भरघोस प्रतिसाद मिळत असल्याचे प्रसिद्धी माध्यमांना सांगितले तर पत्रकार मंदार दोंदे आणि पत्रकार विवेक पाटील यांच्या समन्वयाने पुढील आठवड्यामध्ये ग्लोबल जर्नलिझम या विषयाच्या अनुषंगाने थायलंड मधील शिष्टमंडळासोबत ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे.

---

# गव्हाण विद्यालयात रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा सहविचार सभा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी. भोईर** : रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज,गव्हाण- कोपर येथे रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा २०२६ या विषयांतर्गत सोमवार दिनांक ३ ऑगस्ट २०२६ रोजी शिक्षक सहविचार सभा संपन्न झाली.

रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी संस्था म्हणून ओळखली जाते. या संस्थेमध्ये नेहमीच गुणवत्तापूर्व शिक्षणासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास व्हावा यासाठी या सर्व उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी केली जात आहे. शैक्षणिक वर्ष २०२६- २७ मध्ये याच अनुषंगाने रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन श्री.चंद्रकांत दळवी, सचिव श्री. विकास देशमुख, सहसचिव डॉ.शिवलिंग मेनकुदळे,श्री बी. एन. पवार, डॉ.राजेंद्र मोरे या सर्वांच्या नियोजनांतर्गत 'रयत शिक्षण गुणवत्ता विकास आराखडा २०२६' या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शनिवार दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी रयत शिक्षण संस्थेत कार्यरत असलेल्या सर्व सेवकांची ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली . या कार्यशाळेत संस्थेचे चेअरमन श्री.चंद्रकांत दळवी साहेब यांनी गुणवत्ता विकास आराखड्याच स्वरूप, त्याचे नियोजन आणि त्याची अंमलबजावणी कशा पद्धतीने असेल याबाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले . या कार्यशाळेसाठी गव्हाण शाखेतील सर्व



सेवक उपस्थित होते .

सदर कार्यशाळेत सांगितलेल्या सर्व बाबींचा विचार करून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. ज्योत्स्ना ठाकूर मॅडम यांनी त्वरित अंमलबजावणी करीत सोमवार दि.३ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यालयातील सर्व सेवकांची सहविचार सभा घेतली. संस्थेमार्फत प्रत्येक सेवकास देण्यात आलेल्या गुणवत्ता विकास आराखडा पुस्तकांचा अभ्यास करत सर्व सेवकांनी या सहविचार सभेत सहभाग घेतला. गव्हाण विद्यालयातील कार्यरत असलेल्या सर्व सेवकांकडे ज्या ज्या विभागांचे नियोजन आहे त्या अनुषंगाने मागच्या वर्षी त्या उपक्रमांची झालेली अंमलबजावणी,चालू वर्षी त्यात करण्यात येणाऱ्या सुधारणा आणि भविष्यात सर्व उपक्रमांमध्ये यश संपादित करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी असा एक कृती आराखडा तयार व्हावा या उद्देशाने या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आलं होतं. विद्यालयाच्या प्राचार्या सौ. ज्योत्स्ना ठाकूर मॅडम, ज्येष्ठ शिक्षक व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य श्री. रवींद्र भोईर सर, उपमुख्याध्यापक श्री विलासराव लेंभे सर, पर्यवेक्षिका सौ. शशिकला पाटील मॅडम, ज्येष्ठ शिक्षक व रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर श्री. देवेंद्र म्हात्रे सर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख श्री उगले सर यांच्या मार्गदर्शनाखाली सहविचार सभा संपन्न झाली. संस्थेचे चेअरमन श्री चंद्रकांत दळवी साहेब यांनी ऑनलाईन कार्यशाळेत केलेल्या मार्गदर्शनानुसार आणि कार्यपुस्तिकेतील सर्व मुद्द्यांचा आढावा घेत सदर बैठक यशस्वीपणे संपन्न झाली. या सभेत प्रत्येक सेवकाला आपले मत मांडण्याची संधी देण्यात आली.प्रत्येक सेवकाने आपली जबाबदारी ओळखत आपली भूमिका ठामपणे मांडली. आपल्याकडे असलेल्या विभागात कोणत्या त्रुटी आहेत व त्यानुसार त्या त्रुटी दूर करून त्या विभागांमध्ये गुणवत्ता आणि यश संपादन करण्यासाठी काय करावे लागेल या दृष्टीने उपाययोजना करणे बाबत मुद्दे मांडण्यात आले. येत्या काही दिवसातच विद्यालयाच्या गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने शैक्षणिक विकास आराखडा तयार करून त्याची कार्यवाही केली जाणार आहे.

---

# नवी मुंबई पोलिसांची मोठी कारवाई

## पनवेलमधील लॉजवर छापा वेश्याव्यवसायातून २ पीडित महिलांची सुटका, तिघांविरुद्ध गुन्हा




**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने पनवेल तालुक्यातील शिरढोण येथील 'हॉटेल क्रांतीवीर लॉजिंग अँड बोर्डिंग' येथे छापा टाकून सुरू असलेल्या कथित वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश केला. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून लॉज व्यवस्थापकासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचण्यात आला. बनावट ग्राहक पाठवून करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान संबंधित लॉजमध्ये दोन महिलांना वेश्याव्यवसायासाठी ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी प्रकाश गणेश गुप्ता (लॉज व्यवस्थापक), अनजर फकीर शेख (महिला पुरवठादार) आणि प्रियांजन लखोराय कुमार राय (वेटर) यांच्याविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार (प्रतिबंधक) कायद्यासह संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.

सुटका करण्यात आलेल्या दोन्ही महिलांना आवश्यक संरक्षण व मदत उपलब्ध करून देण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास पनवेल शहर पोलीस ठाण्याकडून सुरू आहे. ही कारवाई नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

---

# खालापूर येथे १३ ऑगस्ट रोजी मोफत मोतीबिंदू व नेत्ररोग निदान शिबिर

**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते** : शांतीलाल संघवी आय इन्स्टिट्यूट, मुंबई यांच्या सहकार्याने सरनोबत नेताजी पालकर व्यापारी सामाजिक संस्था चौक व सरनोबत नेताजी पालकर व्यापारी महिला संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने "सुदर्शन – मोफत मोतीबिंदू आणि संपूर्ण नेत्ररोग निदान शिबिर" गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे.

हे शिबिर सकाळी ९.३० ते दुपारी २.३० या वेळेत द्वारकामाई कॉम्प्लेक्स चौक, तुपगाव रोड, हॉटेल गावरान लज्जत, ता. खालापूर, जि. रायगड येथे होणार आहे.

शिबिरामध्ये संगणकीकृत दृष्टी तपासणी, नेत्रदाब तपासणी, मोतीबिंदू तपासणी, डायबेटिक रेटिनोपॅथी तपासणी, शुगर व बी.पी. तपासणी तसेच चष्म्याच्या नंबरची तपासणी करण्यात येणार आहे.

या शिबिरात सर्व वयोगटातील नागरिक, डोळ्यांची किंवा रेटिनाची शस्त्रक्रिया झालेल्या व्यक्ती, चष्मा वापरणारे, मधुमेह व उच्च रक्तदाब असलेले रुग्ण तसेच डोळ्यांशी संबंधित समस्या असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या रुग्णांना मुंबई येथील शांतीलाल संघवी आय इन्स्टिट्यूटमध्ये मोफत उपचार, आवश्यक तपासण्या, वाहन व्यवस्था, राहण्याची व जेवणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

नोंदणी व अधिक माहितीसाठी

अमेय म्हात्रे – ९६७३८४७५६१,जितेंद्र जाधव – ७४००२ ७५०१२, हर्षल हनुमंते – ९५६१२ ३४५६१

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक: भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धी प्रिंटर्स, मंगल नगर, मलकापूर, पिन ४४३१०१, जि. बुलढाणा येथे छापून दैनिक प्रकाशित केले आहे. 'दैनिक युवक आधार' मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी, ग्रामपंचायत जवळ, मु.पो. आदई, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे.संपादक: भारती संतोष आमले.

Daily Yuvak Aadhar
Printed by Karansingh Prathadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, Mangal Nagar, Malkapur PIN 443101, Dist. Buldhana.Published at Head Office: Daily Yuvak Adhar, Indraprasth Society, Wing Flat No. 203-202, Survey No. 28/1/3, Panvel, Raigad, Adai Panvel Dist. Raigad.Editor: Bharti Santosh Amle.

# समाजप्रिय नेतृत्व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव

## विविध समाजोपयोगी उपक्रमांनी वाढदिवस साजरा; जनसेवेची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : समाजहिताची भूमिका समर्थपणे निभावणारे आणि कार्यसम्राट म्हणून ओळखले जाणारे समाजप्रिय नेतृत्व भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस यंदाही सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा झाला. या विशेष दिवशी आमदार प्रशांत ठाकूर यांनी वडील लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आई शकुंतला ठाकूर यांचे आशिर्वाद घेतले. त्यानंतर पनवेलमधील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात त्यांनी शुभेच्छा स्वीकारल्या. यावेळी हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी शुभेच्छांसाठी गर्दी केली होती. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील अनेक मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. राज्याचे कार्यकुशल लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, भाजपचे प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर





बावनकुळे, मंत्री गिरीश महाजन, मंत्री राधाकृष्ण विखेपाटील, मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री भरतशेठ गोगावले, भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, मुंबई अध्यक्ष अमित साटम, आमदार महेश बालदी, आमदार किसन कथोरे, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार महेंद्र थोरवे, सुप्रसिद्ध अभिनेते विजय गोखले यांच्यासह मंत्रीमंडळातील अनेक मंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी आणि मान्यवरांनी तसेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, कला, क्रीडा, प्रशासकीय, विधी, पत्रकारिता, वैद्यकीय, संगीत, नाट्य, सामाजिक संस्था, संघटना, विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी तसेच हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे अभिष्टचिंतन केले. या वर्षीही वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात आले. जनआरोग्य शिबीर, महारोजगार मेळावा, शैक्षणिक साहित्य वाटप, महिला सक्षमीकरण कार्यक्रम आदींचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांद्वारे आमदार प्रशांत ठाकूर यांनी जनतेप्रती असलेली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली. महापौर नितीन पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या जाणीव एक सामाजिक संस्था पनवेल यांच्या वतीने "ऋतू हिरवा" विशेष संगीतमय कार्यक्रम, के. एन. गुजर हॉस्पिटलच्या वतीने कराड येथे आरोग्य तपासणी, रक्तदान, नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबीर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नादब्रह्म साधना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने संगीत क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ गायिका व विदुषी शुभदा पराडकर यांचे मार्गदर्शन, जयेंद्रशेठ जोशी युवा मंच आणि रविशेठ जोशी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कामोठे येथे समाजोपयोगी वस्तूंच्या वाटपाचा कार्यक्रम,नगरसेविका दर्शना भोईर यांच्या संयोजनाखाली व्हिजन फ्रेंड साकीब गोरे यांच्या सहकार्याने 'देवाभाऊ चष्मा' या विशेष उपक्रमांतर्गत "गरजू तिथे चष्मा आणि मोतीबिंदू निवारण" जनआरोग्य शिबीर, नगरसेवक रविंद्र भगत यांच्यावतीने कळंबोलीत आरोग्य शिबीर, आभा व आयुष्यमान कार्ड, विद्यार्थ्यांचा सत्कार व वही वाटप, तसेच विकासकामांचे उदघाटन, नगरसेवक विजय खानावकर यांच्यावतीने कळंबोलीत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय बॅग वाटप, नागरिकांसाठी नेत्र तपासणी व चष्मे वाटप, तसेच हायमास्ट दिव्यांचे उदघाटन, शिवसेना शहरप्रमुख तुकाराम सरक, नगरसेविका सायली सरक व शिवसेना कळंबोली शहराच्या वतीने वृक्षदिंडी, वृक्षारोपण आणि शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप अशा समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. नगरसेवक संतोष शेट्टी यांच्यावतीने एनसीएमसी कार्ड शिबीर, आरपीआयचे पनवेल महानगरपालिका जिल्हा क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्यावतीने पॅनकार्ड व आधार कार्ड शिबीर, नगरसेवक गणेश कडू यांच्यावतीने पनवेल महापालिकेच्या व इतर शाळांना थोर समाजसुधारक यांच्या जीवनावरील २ हजार पुस्तके वाटप कार्यक्रम, मेसर्स एस.पी. घरत कन्ट्रक्शन व काळुंद्रे भाजपच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, प्रभाग १९ भाजपच्यावतीने स्वच्छता मोहीम तसेच वृक्षारोपण, करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप अशी विविध सामाजिक उपक्रमे आयोजित करण्यात आली. पनवेल विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी विकासात्मक दृष्टिकोन, समाजाभिमुख उपक्रम आणि लोकसहभागाला दिलेले प्राधान्य सातत्याने महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मतदारसंघाचा चेहरामोहरा विकासात रूपांतर झाला. त्या अनुषंगाने पनवेल परिसरातील शहरी तसेच ग्रामीण विकासाला नवे परिमाण प्राप्त झाले आहे. सर्वसामान्यांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठीची त्यांची तळमळ, तसेच प्रत्येक प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी ते करत असलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा, ही जनतेप्रती असलेली त्यांची निष्ठा अधोरेखित करणारी बाब आहे. विकासकामांसोबतच सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रमांना त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यासाठी सातत्याने कार्यरत राहणे, विविध विकासकामांचा नियमित आढावा घेणे आणि प्रशासनाकडे प्रभावीपणे पाठपुरावा करणे, यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांची ओळख एक कर्तव्यदक्ष, कार्यक्षम आणि जनतेशी सदैव जोडलेला लोकप्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. अत्यंत धावपळीची दिनचर्या असूनही मतदारसंघातील नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव उपलब्ध राहण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे. विकासाची दूरदृष्टी, जनसेवेची तळमळ आणि लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांचे कार्य प्रेरणादायी असल्याने आज वाढदिवसादिनी महाराष्ट्रातून त्यांच्यावर अभिष्टचिंतनाचा वर्षाव झाला.

---

# करंजाडे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आनंद द्विगुणित..

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष उपक्रम



**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी** - आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त करंजाडे जिल्हा परिषद शाळेत वह्यांचे वाटपपनवेल:पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून करंजाडे येथे सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. करंजाडे येथील माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. हा स्तुत्य उपक्रम आज, बुधवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी उत्साहात संपन्न झाला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या वाढदिवशी विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांना शुभेच्छा दिल्या. याच पार्श्वभूमीवर करंजाडे येथील जिल्हा परिषद शाळेतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून त्यांचा शैक्षणिक आनंद द्विगुणित करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी करंजाडे गावचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, सदस्य अतिष साबळे, माजी सदस्य नाथा भरवाड, भाजप करंजाडे शहर महिला अध्यक्षा सुषमा मयेकर, तसेच उमेश भोईर, केतन आंग्रे, ओमकार चौधरी यांसह इतर मान्यवर, ग्रामस्थ आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरणमध्ये धुतुमच्या वेअरहाऊसवर 13 तासांची धाड; सुमारे 4 कोटींचा बनावट औषधसाठा जप्त

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरण तालुक्यातील धुतूम येथील एका वेअरहाऊसवर अन्न व औषध प्रशासनाने उरण पोलिसांच्या मदतीने टाकलेल्या धडक धाडीत सुमारे 4 कोटी रुपयांचा संशयित औषधसाठा जप्त करण्यात आल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली आहे. या कारवाईने उरणसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली असून, बनावट अथवा बेकायदेशीर औषधांच्या कथित रॅकेटला मोठा हादरा बसल्याची चर्चा सुरू आहे. शनिवार, दि. 1 ऑगस्ट रोजी सकाळी 12 वाजता सुरू झालेली ही कारवाई रात्री 1 वाजेपर्यंत तब्बल 13 तास सुरू होती. अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी तसेच उरण पोलीस या कारवाईत सहभागी होते. तपास सुरू असल्याने अनेक महत्त्वाची माहिती सध्या गोपनीय ठेवण्यात आल्याचे शासकीय सूत्रांनी सांगितले.कारवाईदरम्यान पॅरासिटामॉल, आर्टीसुनेट इंजेक्शन, टॅडालाफिल यांसह विविध औषधांचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. या औषधांची वैधता, परवाने, कागदपत्रे आणि पुरवठा साखळीची तपासणी सुरू असून प्रयोगशाळेच्या अहवालानंतर पुढील कायदेशीर कारवाई होणार आहे. अधिकृत सूत्रांच्या माहितीनुसार, उरणमध्ये जप्त करण्यात आलेला हा संशयित औषधसाठा रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठ्या कारवायांपैकी एक मानला जात आहे. या प्रकरणाचे धागेदोरे राज्याबाहेरील किंवा देशातील इतर भागांशी जोडलेले आहेत का, याचाही तपास सुरू आहे प्रश्नांचा भडिमार... उत्तर देणार कोण? या धडक कारवाईमुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात संशयित औषधसाठा नेमका कुठून आला? तो कोणाच्या निर्देशानुसार येथे ठेवण्यात आला? या औषधांचा पुरवठा कोणाला केला जाणार होता? या संपूर्ण व्यवहारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का? या सर्व बाबींचा तपास सुरू असून दोषी कोणताही असला तरी त्याच्यावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे उरणमध्ये प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर संशयित औषधसाठा जप्त झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असले तरी ही तर फक्त सुरुवात आहे, अशी अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. यापूर्वीही तालुक्यातील काही गोदामे, कंटेनर यार्ड आणि इतर ठिकाणी परवानगीशिवाय औषधे व खाद्यपदार्थांची कथित साठवणूक होत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्यामुळे ही मोहीम एका वेअरहाऊसपुरती मर्यादित न ठेवता संपूर्ण उरण तालुक्यात विशेष तपास मोहीम राबविण्याची मागणी जोर धरत आहे.

'मनुष्यबळ कमी' की कारवाईत ढिलाई? नागरिकांकडून असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे की, रायगड विभागातील पेण येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालयाकडून अनेकदा मनुष्यबळ अपुरे आहे हे कारण पुढे केले जाते. मात्र, धुतूममध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात संशयित औषधसाठा सापडल्याने नियमित तपासणी, देखरेख आणि अंमलबजावणी कितपत प्रभावी होती, याचीही सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. नागरिकांच्या मते, आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासनाने उरणमध्ये सलग काही दिवस विशेष धाडसत्र राबविल्यास औषधे, खाद्यपदार्थ आणि इतर बेकायदेशीर साठवणुकीशी संबंधित अनेक गंभीर प्रकरणे उघडकीस येऊ शकतात. मात्र, या संदर्भातील सर्व बाबींची सत्यता अधिकृत तपासानंतरच निश्चित होईल. टपरी सील... पण पुढे काय? दरम्यान, काही दिवसांपूर्वी उरण शहरातील एका टपरीवर चरस आणि गांजाच्या कथित विक्रीप्रकरणी कारवाई करून संबंधित टपरी सील करण्यात आली होती. तर टपरी चालकाला सोडून आल्याचे समजते. मात्र, त्या प्रकरणातील तपासाची सद्यस्थिती आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया काय झाली, याबाबत स्थानिक पातळीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या प्रकरणाची अधिकृत माहिती प्रशासनाने जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. कायद्याचा फास अधिक घट्ट होणार? बनावट औषध प्रकरणात औषधे व प्रसाधने कायदा, 1940 तसेच भारतीय न्याय संहिता (इछड) अंतर्गत संबंधित तरतुदींनुसार गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, या कथित रॅकेटचे मूळ सूत्रधार, आर्थिक व्यवहार, उत्पादन केंद्रे, गोदामांचे जाळे आणि संपूर्ण पुरवठा साखळीचा पर्दाफाश करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. तपास निष्पक्ष, सर्वसमावेशक आणि कोणत्याही दबावाशिवाय व्हावा, आता आयुक्त तुकाराम मुंडे यांनीच उरणमध्ये विशेष धाडसत्र राबवावे,अशीही नागरिकांची मागणी जोर धरत आहे.


---

# लोकप्रिय आ. प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कराडमध्ये विविध समाजोपयोगी उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविणारे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सातारा जिल्ह्यातील कराड येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. जी. के. गुजर चॅरिटेबल ट्रस्ट आणि के. एन. गुजर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप, शालेय साहित्य वितरण तसेच जिजाऊ वस्तीगृहात अन्नदान असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस ५ ऑगस्ट रोजी असल्याने त्यानिमित्त जी. के. गुजर चॅरिटेबल ट्रस्टचे व्हाईस चेअरमन इंद्रजीत गुजर आणि विरेंद्र गुजर यांच्या पुढाकारातून या समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात



आले. आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिनिधी म्हणून स्वीय सहाय्यक तथा पनवेल नगरपालिकेचे माजी आरोग्य सभापती उमेश पोद्दार यांनी उपस्थित राहून शिबिराचे उद्धाटन केले. यावेळी इंद्रजीत गुजर, विरेंद्र गुजर, हनुमंत कुंभार, ट्रस्टच्या सचिव माधुरी गुजर, प्राचार्य अन्वर मुल्ला, विशाल पाटील, गजानन भिसे यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी, मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरात नागरिकांची विविध प्रकारची आरोग्य तपासणी करण्यात आली. विशेषतः

### जी. के. गुजर चॅरिटेबल ट्रस्ट आणि के. एन. गुजर हॉस्पिटलचा पुढाकार मोफत आरोग्य शिबिर, रक्तदान, चष्मे वाटप, शालेय साहित्य वितरण व अन्नदान

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांना आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. नेत्रतपासणीनंतर गरजू लाभार्थींना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याच परंपरेचा भाग म्हणून यंदाही समाजातील गरजू घटकांपर्यंत आरोग्यसेवा आणि सामाजिक मदत पोहोचविण्याचा हा उपक्रम राबविण्यात आला. 'निरोगी समाज हीच खरी संपत्ती' या भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. या उपक्रमांतर्गत २८० रक्तदात्यांनी रक्तदान केले, तर ५०४ गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण आणि जिजाऊ वस्तीगृहात अन्नदान करून वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**तहसिलदार महागांव यांचे कार्यालय, महागांव**

**Email id- tgp.mahagoan@gmail.com** **दुरध्वनी क्रमांक 07236-222238**
**क्रमांक/म.स/ जन्म-मृत्यु नोंद/कावि/ 465/2026** **दिनांक 20/07/2026**

**-- जाहीरनामा--**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार- अकुंश प्रकाश राठोड रा करंजी ता महागांव जि.यवतमाळ यांचा मुलगा नामे संजय अंकुश राठोड जन्म नोद संचिव ग्रा.पं. करंजी येथे दि.07/07/2020 रोजी झाला आहे, परंतु त्यांच्या जन्म नोंद. सचिव ग्रा.पं. कंरजी नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म /नोंदणी अधिनियम कलम 13(3)/ संचिव ग्रा.पं.कंरजी यांना जन्म /नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात दिनांक 14/08/2026पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

**ठिकाण:महागाव** **स्वा/- अभय मस्के**
**दिनांक:५/८/२०२६** **तहसीलदार महागाव**

## ग्रामीण भागातील कर्मचारीरुपी पंचमहाभूतांनी व जनतेनी एकत्रित काम केल्यास सर्वांगीण विकास शक्य – चितांगराव कदम

**दैनिक युवक आधार**

**उमरखेडतालुकाप्रतिनिधीराजूगायकवाड (मोहदरी)** : महसूल विभागाकडून ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्याचा शासन प्रयत्नशील आहे. वैयक्तिक व सार्वजनिक लाभार्थी योजना,पांदण रस्त्याची कामे गावपातळीवर कर्मचारीरुपी असलेली तलाठी, ग्रामसेवक,शिक्षक,जनमीत्र व सोसायटी सचिव या पंचमहाभूतांनी व जनतेनी एकत्र येऊन कामाची सांगड घातल्यास ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होऊन अर्थव्यवस्था मजबूत होऊ शकते असे प्रतिपादन मागील ६ वर्षापासून तिवरंग झाडगांव व भांबरखेडा येथील साज्याचे तलाठी म्हणून कार्यरत असणारे गुलामोद्दीन शेख यांच्या बदलीच्या निरोप समारंभाचे अध्यक्ष म्हणून संभाजी बापूंच्या मंदिरात चितांगराव कदम सर बोलत होते.

कार्यक्रमाचे आयोजन भांबरखेडा येथील शेतकरी व शेतमजूरांनी एकत्रित येऊन केले होते. प्रमुख अतिथी म्हणून मनोज गायकवाड मंडळ अधिकारी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन



व प्रास्ताविक डॉ. बाळासाहेब देशमुख यांनी केले. तलाठी साहेबांनी त्यांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांना आपल्या शेतातील धान्य नेआन करण्यासाठी पांदण रस्त्ये मोकळे केलीत, स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून दिली, गावात नवीन मतदान केंद्र उपलब्ध करून दिले व विविध योजनेंच्या लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश देशमुख, बाळासाहेब देशमुख, संभाजी देशमुख,विवेकानंद देशमुख, संतोष देशमुख, नागोराव देशमुख, शिवाजीराव वसफळकर,बाळू शिंदे, अविनाश शिंदे,सुरेश राणे ,मंचक देशमुख, ज्ञानेश्वर वसफळकर,प्रवीण धोंगडे उपस्थित होते.

## मैत्रीचे ऋण आणि शाळेप्रती कृतज्ञता;

### उरण येथील एन. आय. हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांकडून १३ गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीचा हात! १०७ वर्षांची शैक्षणिक परंपरा लाभलेल्या शाळेत रंगला आठवणींचा सोहळा!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : १०७ वर्षांची मोठी आणि देदीप्यमान शैक्षणिक परंपरा लाभलेल्या जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट संचलित एन. आय. हायस्कूल, उरण येथील १९८२ च्या दहावी (एसएससी) आणि १९८४ च्या बारावी कॉमर्स (वाणिज्य) बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेप्रती अनोखी कृतज्ञता व्यक्त केली आहे. या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत शाळेतील १३ गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी म्हणून २५,००० रुपयांची आर्थिक मदत केली आहे. ही सर्व रक्कम विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची संस्था फी म्हणून भरण्यात आली आहे.

या सोहळ्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील जुन्या आठवणींना मनमोकळा उजाळा दिला. शाळेतील शिक्षक, वर्गखोल्या, प्रयोगशाळा आणि ग्रंथालय या सर्व माध्यमांतून जुन्या शालेय जीवनाचे



दिवस त्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहिले. आपल्याला घडवणाऱ्या तत्कालीन शिक्षकांच्या आठवणी काढताना सर्वच माजी विद्यार्थ्यांच्या मनात आदरयुक्त भावना दाटून आल्या होत्या.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरी, व्यवसाय आणि संसार यात्रेच्या निमित्ताने या बॅचचे प्रवासी वेगवेगळ्या वाटांनी निघून गेले होते. प्रदीर्घ कालावधीनंतर, सन २०१९ मध्ये या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत स्वतःचा व्हॉट्सॲप ग्रुप निर्माण केला. या ग्रुपच्या माध्यमातून सर्व, सर्व जुने मित्र पुन्हा एकदा जोडले गेले. केवळ डिजिटल संपर्कापुरते मर्यादित न राहता या ग्रुपच्या माध्यमातून स्नेहसंमेलन वाढदिवस सेवानिवृत्ती सोडणे आणि पावसाळी सहली आनंदाने साजरा केला जातात. एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होणे, आणि गरजूंना मदत करणे, अशी खरी मैत्री त्यांनी जपली. याच मैत्रीच्या धाग्यातून आपल्या मातृभूमी सारख्या असलेल्या शाळेसाठी काहीतरी देणे लागतो या भावनेतून ५ऑगस्ट २०२६ रोजी या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाप्रसंगी शाळेचे पर्यवेक्षक भूषण झोपे सर, सातपुते सर ,खरमाटे सर आणि जेष्ठ लिपिक प्रदीप म्हात्रे सर प्रामुख्याने उपस्थित होते. या कौतुकास्पद आणि संवेदनशील उपक्रमाबद्दल शाळेच्या प्रशासनातर्फे सर्व माजी विद्यार्थ्यांचे विशेष आभार मानण्यात आले. भविष्यातही माजी विद्यार्थ्यांकडून अशाच प्रकारचे सहकार्य लाभेल असी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ज्येष्ठ लिपक प्रदीप म्हात्रे सर यांनी केले. माजी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे संपूर्ण उरण परिसरातून कौतुक होत आहे.

## वावोशी–परखंदे रस्त्याच्या निकृष्ट दुरुस्तीवर पत्रकारांचा आक्षेप; दर्जेदार कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे** : खालापूर तालुक्यातील वावोशीफाटा –परखंदे धनगरवाडी रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून पावसाळ्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या पार्श्वभूमीवर रस्त्यावरील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यताप्राप्त तांत्रिक निकषांनुसार व दर्जेदार पद्धतीने भरावेत, तसेच कामाच्या वेळी संबंधित अभियंता किंवा अधिकृत तांत्रिक पर्यवेक्षकाची प्रत्यक्ष उपस्थिती बंधनकारक करावी, अशी मागणी छत्तीशी मराठी पत्रकार संघ, खालापूर यांच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता/शाखा अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, वावोशीफाटा –परखंदे धनगरवाडी मार्गावरील खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने विद्यार्थी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या मार्गावर अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत असून तातडीने दर्जेदार दुरुस्तीची आवश्यकता निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वी या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे



काम एका स्थानिक कंत्राटदारामार्फत सुरू करण्यात आले होते. मात्र पाण्याने भरलेल्या खड्ड्यांमध्ये कोणतीही पूर्वतयारी न करता थेट खडी टाकून ती फावड्याने पसरविण्याचे काम सुरू असल्याचे निदर्शनास आले. विशेष म्हणजे, त्या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचा कोणताही अभियंता किंवा अधिकृत तांत्रिक पर्यवेक्षक घटनास्थळी उपस्थित नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या निकृष्ट कामाबाबत ग्रामस्थांनी आक्षेप घेतल्यानंतर संबंधित काम थांबविण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आल्यामुळे भविष्यातील सर्व दुरुस्तीची कामे तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन करूनच करण्यात यावीत, अशी मागणी पत्रकार संघाने केली आहे. कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची गुणवत्ता, आवश्यक जाडी, योग्य दाबणी (कम्पॅक्शन) आणि इतर तांत्रिक बाबींची तपासणी करूनच खड्डे भरण्याचे काम पूर्ण करावे, तसेच काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून दर्जेदार कामाची खात्री करावी,अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. सार्वजनिक निधीतून होणाऱ्या विकासकामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि सुरक्षितता राखणे ही संबंधित विभागाची जबाबदारी असल्याचे नमूद करत या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने आवश्यक कार्यवाही करावी,अशी मागणी हनुमंत मोरे, संतोष (सतिष) शेवाळे आणि जतिन भिमसेन मोरे या पत्रकारांनी केली आहे.

## राजसाहेब ठाकरे पनवेलमध्ये; मनसे कार्यकर्त्यांचा जल्लोष शिगेला!

**पनवेल प्रतिनिधी:दिपक कोळवणकर** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पनवेल महानगर पक्ष कार्यालयाच्या भव्य उद्घाटन सोहळ्याची घोषणा होताच संपूर्ण पनवेल शहरासह रायगड जिल्ह्यातील मनसे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्षाच्या नव्या कार्यालयामुळे मनसेच्या संघटनात्मक बांधणीला नवी दिशा मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

रविवार, दिनांक ९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता हा भव्य उद्घाटन सोहळा पार पडणार असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा. श्री. राजसाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते या कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. तसेच महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे नेते व अध्यक्ष मा. श्री. अमितसाहेब ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

नवीन पक्ष कार्यालयाचे ठिकाण शॉप नं. ३, परशुराम निवास, पनवेल, रायगड – ४१०२०६ (पनवेल महानगरपालिकेसमोर) असे आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून




पनवेल महानगरातील संघटनात्मक कामकाज अधिक वेगाने आणि प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे पक्ष पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या उद्घाटन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात विविध ठिकाणी स्वागत फलक, भगवे झेंडे, सजावट आणि कार्यकर्त्यांच्या बैठका सुरू आहेत. राजसाहेब ठाकरे यांच्या आगमनामुळे मनसे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड ऊर्जा संचारली असून, हा कार्यक्रम पनवेलच्या राजकीय इतिहासातील एक महत्त्वाचा क्षण ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

पनवेल महानगरातील सर्व शाखा, विभाग, महिला आघाडी, विद्यार्थी सेना, कामगार संघटना तसेच रायगड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याने हा सोहळा भव्य स्वरूप धारण करणार आहे.

“राजसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये मनसेची ताकद अधिक भक्कम करण्याचा आणि संघटनाला नवे बळ देण्याचा हा ऐतिहासिक क्षण आहे,” अशी प्रतिक्रिया अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.कार्यक्रमास सर्व मनसे पदाधिकारी, कार्यकर्ते, महाराष्ट्र सैनिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## ९ ऑगस्ट क्रांती दिनी हदगावात शेतकऱ्यांचा एल्गार; "कर्जमाफी नव्हे, कर्जमुक्ती"साठी राज्यस्तरीय मेळावा

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा देणाऱ्या ९ ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त नांदेड जिल्ह्यातील हदगाव येथे शेतकरी संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला असून, देवणी शहरातील रहिवाशी असलेले शेतकरी संघटना मराठवाडा अध्यक्ष आनंद जीवने (पृथ्वीराज पाटील) यांनी राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

मेळाव्याचा केंद्रबिंदू "कर्जमाफी नव्हे, कर्जमुक्ती" हा असणार आहे. शेतकरी संघटनेच्या मते, कर्जमाफी हा तात्पुरता उपाय असून शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होतो. त्यामुळे शेतकरी कायमस्वरूपी कर्जमुक्त होईल, अशी दीर्घकालीन आणि शाश्वत कृषी धोरणे सरकारने राबवावीत, अशी संघटनेची प्रमुख मागणी आहे.

शेतीपंपांसाठी विनाअट २४ तास अखंडित वीजपुरवठा, चालू खरीप हंगामासाठी प्रत्येक शेतकऱ्याला ५० हजार रुपयांचे विशेष अनुदान, ऊस उत्पादकांना किमान ७,५०० रुपये प्रतिटन पहिला हप्ता, शेतीमालावरील निर्यातबंदी तातडीने उठविणे, पर्यावरणपूरक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिटचा लाभ तसेच वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणीही या मेळाव्यातून करण्यात येणार आहे.

या राज्यस्तरीय मेळाव्यास शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील, महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट, अजित काळे, राज्य उपाध्यक्ष सुरेंद्र अंबुलगे, महिला आघाडीच्या राज्याध्यक्षा प्रगती खरे-चव्हाण, मराठवाडा अध्यक्ष आनंद जीवने (पृथ्वीराज पाटील) यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हजारो शेतकरी उपस्थित राहणार आहेत.

## पळशी येथे महिलेची छेड काढून मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील पळशी येथे २८ वर्षीय विवाहित महिलेची छेड काढून तिला व तिच्या आई-वडिलांना मारहाण केल्याची घटना मंगळवारी रात्री साडेआठ वाजता घडली. या प्रकरणी बुधवारी दुपारी सिल्लोड ग्रामीण पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मंगळवारी रात्री योगेश कचरू निकम याने तिची छेड काढली. याबाबत जाब विचारताच योगेश कचरू निकम, रुपेश कचरू निकम, आजिनाथ कचरू निकम व मालनबाई कचरू निकम (सर्व रा. पळशी, ता. सिल्लोड) यांनी संगनमताने शिवीगाळ करत तिला मारहाण केली. तसेच वाद सोडविण्यासाठी आलेल्या तिच्या आई-वडिलांनाही बेदम मारहाण करण्यात आली.पीडित महिलेच्या फिर्यादीवरून चौघांविरुद्ध सिल्लोड ग्रामीण पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक रवींद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉन्स्टेबल राजू काकडे पुढील तपास करीत आहेत.

## मुल्हेर गाव परिसरातील सार्वजनिक प्रसाधनगृह (मुतारीची) दुरावस्था ; ग्रामस्थ त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी-दीपक गायकवाड** : जिल्हा परिषद शाळा व गाव परिसरात सार्वजनिक प्रसाधन गृहात घाण कचरा आणि मुत्र साचल्याने दुर्गंधी येत असून आजार फैलावत आहेत. मूत्राचे साठवण झाल्याने यावर डास, मच्छर यांचा प्रादुर्भाव वाढत असून स्थानिक निवासींना संसर्गजन्य आजाराची लागण होत आहे.या प्रसाधन गृहाच्या दुरवस्थेमुळे शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना प्रसाधन गृहाबाहेरच लघु शंका करण्याची वेळ येत आहे.

सार्वजनिक मुताऱ्यांची आणि स्वच्छतागृहांची दुरवस्था ही एक मोठी आणि गंभीर समस्या बनली आहे. स्थानिक ग्रामपंचायतच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना, विशेषतः महिलांना, विद्यार्थिनींना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मुताऱ्यांची सद्यस्थिती आणि मुख्य समस्या ही पाण्याची अनुपलब्धता:, मुताऱ्यांमध्ये पाण्याची कोणतीही सोय नाही, ज्यामुळे प्रचंड दुर्गंधी पसरते. तुटलेली भिंत, मुताऱ्यांमधील भांडी नसणे, नळ



नसणे अशी गंभीर बाब ग्रामस्थांना सतावत आहे. वरवरची रंगरंगोटी: जुनी व जीर्ण झालेली भिंती बदलण्याऐवजी केवळ बाहेरून रंगरंगोटी करून ती नवीन असल्याचा आभास निर्माण केला जात असेल तर केवळ सुरक्षेचा अभाव: च नाही तर यामुळे स्वच्छतागृहे वापरणे महिलांसाठी असुरक्षित बनले आहे.

## मोरे विद्यालयात राष्ट्रीय कुष्ठरोग जनजागृती व विद्यार्थी तपासणी मोहीम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**आर्णी तालुका प्रतिनिधी मुरली राठोड** : राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत उपकेंद्र उमरी कापेश्वरच्या वतीने स्थानिक मोरे विद्यालय, उमरी कापेश्वर येथे ‘राष्ट्रीय कुष्ठरोग जनजागृती व विद्यार्थी तपासणी कार्यक्रम’ अत्यंत उत्साहात पार पडला. आरोग D च्या पाठबळावर आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने हा उपक्रम अत्यंत प्रभावी ठरला.

आजाराविषयी सविस्तर मार्गदर्शन व गैरसमज दूर

कार्यक्रमाची सुरुवात आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाने झाली. उपकेंद्र उमरी कापेश्वरचे आरोग्य सेवक गौतम शेंडे यांनी विद्यार्थ्यांना कुष्ठरोगाची प्रारंभिक लक्षणे, आजाराविषयी समाजात असलेले गैरसमज, वेळेत निदान होण्याचे महत्त्व



आणि शासकीय रुग्णालयांत उपलब्ध असणारे मोफत उपचार याविषयी सविस्तर माहिती दिली.

"कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. शरीरावर कोणतेही संशयास्पद लक्षण किंवा डाग आढळल्यास न घाबरता त्वरित शासकीय आरोग्य संस्थेत तपासणी करून उपचार सुरू करावेत," असे आवाहन श्री. शेंडे यांनी विद्यार्थ्यांना केले.

मार्गदर्शनानंतर शाळेतील विद्यार्थ्यांची प्राथमिक आरोग्य तपासणी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यात आली.

विद्यार्थ्यांचा आरोग्य जनजागृतीचा संकल्प

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबीयांमध्ये आणि परिसरातील नागरिकांमध्ये कुष्ठरोगाबाबत जनजागृती करण्याचा व अंधश्रद्धा दूर करण्याचा एकमुखाने संकल्प केला.

**मान्यवरांच्या प्रमुख उपस्थिती**

या महत्त्वपूर्ण आरोग्य शिबिरास मोरे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. चव्हाण सर आणि सर्व शिक्षकवृंद यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले. तसेच आरोग्य विभागाकडून उपकेंद्र उमरी कापेश्वरच्या आरोग्य सेविका रंजना मुरमुरे, आरोग्य सेवक गौतम शेंडे, सुनील गेडाम (आरोग्य सेवक, आयता), संदीप कनाके (आरोग्य सेवक, पाळोदी), आणि आशा सेविका रेखा कांबळे यांनी उपस्थित राहून यशस्वीरीत्या तपासणी व मार्गदर्शन पार पाडले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालय प्रशासन, शिक्षकवृंद आणि आरोग्य विभागाच्या पथकाने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या या स्तुत्य उपक्रमाचे संपूर्ण परिसरात कौतुक होत आहे.

# पर्यायी रस्ता नसल्याने येवदा ग्रामस्थांचे हाल; खचलेल्या पुलाच्या तातडीच्या दुरुस्तीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे मुसळधार पावसामुळे लेंडी नाल्यावरील मुख्य पूल खचल्याने गावाचा प्रमुख संपर्क मार्ग पूर्णपणे बंद झाला आहे. पर्यायी रस्त्याची कोणतीही व्यवस्था न करता नियमित मार्ग बंद करण्यात आल्याने ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी तसेच रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तातडीने नवीन पुलाचे बांधकाम सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुलाची पाहणी करून सुरक्षेच्या दृष्टीने पुलावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद केली आहे. मात्र पर्यायी मार्ग उपलब्ध करून न दिल्याने परिसरातील हजारो नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, सततच्या पावसामुळे लेंडी नाल्याला पूर आल्याने पुलाचा मोठा भाग खचला असून, आणखी नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने आपत्कालीन निधीतून मंजुरी देऊन उच्च क्षमतेच्या नवीन पुलाचे काम युद्धपातळीवर सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

याप्रकरणी शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी प्रदीप वडतकर यांनीही जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन तातडीने निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने त्वरित निर्णय न घेतल्यास ९ ऑगस्ट रोजी येवदा ग्रामपंचायत कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

ग्रामस्थांनीही प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन सुरक्षित पर्यायी रस्ता उपलब्ध करून द्यावा आणि नवीन पुलाचे बांधकाम विलंब न करता सुरू करावे, अशी मागणी केली आहे.

# राखेतून उगवला जीवनाचा संदेश!"नदी प्रदूषणाला नकार

**दैनिक युवक आधार**

**सिद्धार्थ धंदरे बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी** : बुलडाणा जिल्ह्यातील डोंगरशेवली येथे पर्यावरण संरक्षण, सामाजिक जबाबदारी आणि मानवी संवेदनांचा अनोखा संगम घडवणारा प्रेरणादायी उपक्रम मंगळवारी पार पडला. परंपरेला पर्यावरणपूरक दिशा देत रक्षाविसर्जनाची राख नदीत विसर्जित न करता त्याच राखेत पिंपळाचे वृक्षारोपण करण्यात आले. या अनोख्या उपक्रमामुळे संपूर्ण परिसरात या निर्णयाचे कौतुक होत असून, हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

दि. ३१ जुलै २०२६ रोजी डोंगरशेवली येथील कै. शिवाजी मोतीराम वानखेडे (वय ४०) यांचे दुःखद निधन झाले होते. त्यांच्या रक्षाविसर्जनाचा कार्यक्रम दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी बौद्ध स्मशानभूमीत आयोजित करण्यात आला होता. मात्र पारंपरिक पद्धतीने राख नदीत विसर्जित करण्याऐवजी स्थानिक भीमशक्ती नवयुवक मंडळ, पंच



कमेटी आणि समस्त समाजबांधवांनी पर्यावरणपूरक विचार स्वीकारत एक वेगळाच निर्णय घेतला.

रक्षाविसर्जनाची राख नदीत टाकल्याने जलप्रदूषण वाढू शकते, याची जाणीव ठेवून सर्वांनी एकमताने त्या राखेत पिंपळाचे रोप लावले. मृत व्यक्तीच्या स्मृती जपतानाच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या मनाला स्पर्श करून गेला.

"एका व्यक्तीच्या स्मृतीतून अनेकांना जीवन देणारे झाड उभे राहावे," या भावनेतून हा निर्णय घेण्यात आला.

या वेळी उपस्थितांनी "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश देत प्रत्येकाने आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला. सरकारच्या पर्यावरण संवर्धनाच्या धोरणाला प्रत्यक्ष कृतीतून पाठबळ देत डोंगरशेवलीतील युवकांनी सामाजिक परिवर्तनाचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

गावकऱ्यांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले असून, धार्मिक परंपरा जपत पर्यावरणाचेही रक्षण करता येते, हे या कृतीतून सिद्ध झाल्याची भावना व्यक्त केली. आजच्या काळात वाढते प्रदूषण, वृक्षतोड आणि बदलते हवामान यामुळे अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचेही मत उपस्थितांनी व्यक्त केले.

रक्षाविसर्जनासारख्या पारंपरिक विधीला पर्यावरणपूरक स्वरूप देऊन

### रक्षाविसर्जनाऐवजी पिंपळाचे वृक्षारोपण करून डोंगरशेवलीच्या नवयुवकांनी घडवला राज्यासाठी आदर्श ठरणारा अनोखा उपक्रम

डोंगरशेवलीच्या नवयुवकांनी समाजाला एक नवा विचार दिला आहे. हा उपक्रम केवळ एका कुटुंबापुरता मर्यादित न राहता संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी ठरावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

१) नदी प्रदूषणाला दिला ठाम नकार.

२)रक्षाविसर्जनाऐवजी राखेत पिंपळाचे वृक्षारोपण.

३)पर्यावरण संवर्धनाचा समाजाला दिला प्रेरणादायी संदेश.

४) भीमशक्ती नवयुवक मंडळ, पंच कमेटी व ग्रामस्थांचा अभिनव पुढाकार.

५) "झाडे लावा, झाडे जगवा" या संदेशाला प्रत्यक्ष कृतीची जोड.

# जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाची प्रेरणादायी गाथा

**दैनिक युवक आधार**

**आर्णी तालुका प्रतिनिधी-मुरली राठोड** : कोणत्याही क्षेत्रात यशाची शिखरे सर करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि प्रचंड आत्मविश्वास असेल, तर स्वप्ने नक्कीच सत्यात उतरतात. याचे उत्तम उदाहरण विदर्भाच्या मातीतून पुढे आलेल्या आणि सध्या पुण्यात स्थायिक असलेल्या सौ. कांचन रायपूरे यांनी करून दाखवले आहे. नुकत्याच पार पडलेल्या 'आंतरराष्ट्रीय ELITE' सौंदर्य व कौशल्य स्पर्धेत त्यांनी 'प्रथम उपविजेता' (First Runner-up) हा मान मिळवत विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे.

शिक्षण आणि जडणघडण सौ.कांचन रायपूरे यांचे मूळ शिक्षण अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर येथे झाले आहे. मूर्तिजापूरसारख्या मध्यमवर्गीय आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या शहरात त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाले. लहानपणापासूनच प्रत्येक गोष्टीत अग्रेसर राहण्याची त्यांची वृत्ती होती. संकटांवर मात करत आणि कुटुंबाची साथ लाभत त्यांनी आपल्या उच्च शिक्षणाची




आणि स्वप्नांची पायाभरणी केली.

पुण्यात गाजवला दबदबा

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुण्यासारख्या उच्च व प्रगतशील शहरात त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत असतानाच त्यांनी स्वतःमधील कलागुणांना आणि महत्त्वाकांक्षांना कधीही मसूद होऊ दिले नाही. 'आंतरराष्ट्रीय ELITE' सारख्या

**विदर्भाच्या लेख सौ. कांचन रायपूरे पुण्यात ठरल्या 'आंतरराष्ट्रीय ELITE' स्पर्धेच्या 'प्रथम उपविजेता'!**

मानाच्या स्पर्धेत देश-विदेशातून आलेल्या उच्च-गुणवत्तेच्या स्पर्धकांशी मुकाबला करत सौ. कांचन यांनी आपल्या सौंदर्याची, बुद्धिमत्तेची आणि आत्मविश्वासाची चुणूक दाखवली.

तरुणाईसाठी ठरल्या प्रेरणास्थान

सौ. कांचन रायपूरे यांच्या या यशामुळे मूर्तिजापूर आणि विदर्भात आनंदाचे वातावरण पसरले आहे. मूर्तिजापूरची एक सामान्य लेक आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकू शकते, हा संदेश त्यांनी आजच्या तरुण पिढीला दिला आहे. त्यांच्या या यशामध्ये त्यांच्या कठोर परिश्रमाचा आणि अफाट आत्मविश्वासाचा मोठा वाटा आहे.

या यशाबद्दल सौ. कांचन रायपूरे यांचे सर्वत्र कौतुक होत असून, विविध क्षेत्रांमधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पोदर इंटरनॅशनल स्कूल, ओझर येथे 2026–27 शैक्षणिक सत्रासाठी वाहतूक बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**ओझर.प्रतिनिधी राकेश शर्मा** : पोदर इंटरनॅशनल स्कूल, ओझर येथे शैक्षणिक सत्र 2026–27 साठी वाहतूक बैठक यशस्वीपणे पार पडली. या बैठकीत शाळेच्या वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेऊन ती अधिक सुरक्षित व कार्यक्षम करण्यावर चर्चा करण्यात आली.



बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका डॉ. जेसिंथा पार्के होत्या. यावेळी धर्मराज जैस्वाल, आरटीएम, पोदार स्कूल्स नाशिक विभाग; विशाल मेंढे, प्रशासकीय अधिकारी; सुभाष वावरे, वाहतूक पर्यवेक्षक; आणि श्री. अमोल कदम, आरटीओ अधिकारी, नाशिक उपस्थित होते. वाहतूक समितीतील पालक प्रतिनिधी आणि शिक्षक सदस्यांनीही सक्रिय सहभाग घेतला.

बैठकीत विद्यार्थ्यांची प्रवासादरम्यान सुरक्षा, बस मार्ग नियोजन, वाहनांची देखभाल व कायदेशीर अनुपालन, चालक व वाहकांच्या जबाबदाऱ्या, आपत्कालीन परिस्थितीसाठी तयारी आणि वाहतूक विभागाशी समन्वय या विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

याप्रसंगी बोलताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, "गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुरुवात सुरक्षित प्रवासाने होते" आणि प्रत्येक पालकाला दिलासा तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला सुरक्षित प्रवास मिळवून देण्यासाठी शाळा कटिबद्ध आहे.

बैठकीच्या शेवटी प्रशासकीय अधिकारी विशाल मेंढे यांनी आभार मानले.

# संघर्षातून घडलेले प्रेरक नेतृत्व: कुर्ली शाळेचा 'सुवर्णकाळ' घडवणारे विलासजी किरणापुरे सर सेवामुक्त!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द, प्रामाणिकपणा आणि अथक परिश्रम यांच्या बळावर यशाचे सर्वोच्च शिखर गाठता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, कुर्ली येथील उच्च श्रेणी मुख्याध्यापक आदरणीय श्री विलासजी किरणापुरे सर. अत्यंत हलाखीच्या आणि गरिबीच्या परिस्थितीतून स्वतःचा जीवनप्रवास सुरू करून शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. आज ते केवळ यशस्वी मुख्याध्यापक म्हणून नव्हे, तर असंख्य शिक्षक, विद्यार्थी आणि तरुणांसाठी प्रेरणास्थान व मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात.



नुकतेच आपल्या प्रदीर्घ, यशस्वी आणि गौरवास्पद सेवेनंतर त्यांनी सेवानिवृत्ती स्वीकारली. मात्र त्यांच्या कार्याचा ठसा आणि त्यांनी निर्माण केलेली शैक्षणिक परंपरा कायम स्मरणात राहणारी आहे. विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य, शाळेचा सर्वांगीण विकास आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच आपल्या कार्याचे ध्येय मानत त्यांनी कुर्ली जिल्हा परिषद शाळेला यशाच्या नव्या उंचीवर नेले.त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या राज्यस्तरीय अभियानात शाळेने २०२५ मध्ये द्वितीय, तर २०२६ मध्ये थेट प्रथम क्रमांक पटकावत संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या प्रयत्नांतून शाळेत २४ संगणक आणि मास्टर बोर्डसह सुसज्ज डिजिटल वर्गखोली उभारण्यात आली. प्रत्येक वर्गात स्मार्ट टीव्हीची सुविधा उपलब्ध करून विद्यार्थ्यांना आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची नवी दिशा देण्यात आली. तसेच शाळेला 'पीएम श्री शाळा मिनी'चा दर्जा मिळवून देण्यातही त्यांचे योगदान मोलाचे ठरले.विलासजी किरणापुरे सरांचा प्रवास हा केवळ एका शिक्षकाचा किंवा मुख्याध्यापकाचा नाही, तर संघर्षाला संधीमध्ये बदलणाऱ्या एका असामान्य व्यक्तिमत्त्वाचा प्रवास आहे. आयुष्यातील अत्यंत कठीण प्रसंगांना धैर्याने सामोरे जात त्यांनी स्वतःचे जीवन घडवले आणि त्याचबरोबर हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यालाही नवी दिशा दिली. आज अनेक शिक्षक त्यांच्या कार्यशैलीचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून काम करत आहेत, तर असंख्य विद्यार्थी त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन स्वतःचे भविष्य घडविण्याचा प्रयत्न करत आहेत.ज्ञान, शिस्त, संस्कार आणि माणुसकीची मूल्ये जपत आयुष्यभर शिक्षणसेवेला वाहिलेल्या विलासजी किरणापुरे सरांना कुर्ली शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांकडून मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. त्यांच्या आयुष्याची ही नवी इनिंग उत्तम आरोग्य, सुख, समाधान आणि यशाने परिपूर्ण होवो, हीच सर्वांची सदिच्छा. संघर्षातून यशाचा सुवर्णइतिहास घडवणारे आणि असंख्य आयुष्यांना प्रकाश देणारे विलासजी किरणापुरे सर यांचे योगदान शिक्षण क्षेत्रात सदैव प्रेरणादायी राहील.

# खा. डॉ. अनिल बोंडे, आ. प्रकाश भारसाकळे यांचे बॅनर हटवल्याने दर्यापुरात भाजप आक्रमक



**नगरपरिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारावर दोन तास ठिय्या आंदोलन; प्रशासनावर पक्षपातीपणाचा आरोप, दोषी अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी**

'दर्यापूर नगरपरिषद प्रशासन लोकप्रतिनिधींच्या दबावाखाली पक्षपातीपणा करत आहे. काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे आणि आमदार गजानन लवटे यांच्या सांगण्यावरूनच आमचे नेते खासदार डॉ. अनिल बोंडे व आमदार प्रकाश भारसाकळे यांचे बॅनर हटवण्यात आले. शहरातील काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटाचे बेकायदेशीर बॅनर प्रशासनाला दिसत नाहीत का? केवळ भाजपच्या नेत्यांचे बॅनर लक्ष्य करून हटवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन झालेच पाहिजे; अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.'

— नकुल सोनटक्के

जिल्हाध्यक्ष, भाजप अनुसूचित जाती मोर्चा, अमरावती

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे व आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या वाढदिवसानिमित्त दर्यापूर शहरात लावण्यात आलेले बॅनर नगरपरिषदेच्या पथकाने हटवल्याने शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या कारवाईचा निषेध करत भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दर्यापूर नगरपरिषदेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर तब्बल दोन तास ठिय्या आंदोलन करत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी नगरपरिषद प्रशासनावर पक्षपाती कारवाईचा गंभीर आरोप केला. भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे आमदार गजानन लवटे यांच्या राजकीय दबावाखाली नगरपरिषद प्रशासन काम करत असल्याचा आरोप केला. शहरात इतर पक्षांचे अनेक अवैध बॅनर आणि होर्डिंग्ज कायम असताना केवळ भाजपच्या नेत्यांचेच बॅनर हटविण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर पक्षपातीपणाचा ठपका ठेवत

**भाजपच्या प्रमुख मागण्या**

भाजपच्या बॅनर हटविण्याच्या कारवाईची चौकशी करावी.

संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी.

सर्व पक्षांवर समान निकषांनुसार कारवाई करावी.

राजकीय दबावाखाली काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.

तातडीने निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली.

अन्यथा आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनात भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश पदाधिकारी सलीमभाई घाणीवाले, जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र ढोकणे, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के, शहर मंडळ अध्यक्षा मेघाताई भारती, नगरपरिषद गटनेते तथा जिल्हा सचिव दिनेश पारडे, नगरसेवक मयूर लांडे, रवींद्र राजपूत, गोकुळ पाटील भडांगे, संकेत भूतडा, आरती वाभडे, कृष्णा स्वामी, सुरेश वाभडे, शुभम गजभिये यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनामुळे काही काळ नगरपरिषद परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

# रजनीकांत डालूरामजी बोरेले यांना पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समिति विरुद्धचा तपासणी अहवाल निशुल्क प्राप्त : अवालात गंभीर ठपके

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** : पांढरकवडा येथील प्रख्यात माहिती अधिकार कार्यकर्ता आणि व्हिसल ब्लोअर, अपक्ष संचालक रजनीकांत डालूरामजी बोरेले पांढरकवडा यांना तहसीलदार तथा अपीलीय प्राधिकारी राजेन्द्र इंगळे तहसील कार्यालय केळापुर यांच्या आदेशानुसार कृषी उत्पन्न बाजार समिति, पांढरकवडा तपासणी अहवाल अखेर माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी यांनी निःशुल्क पुरविली आहे.

रजनीकांत डालूरामजी बोरेले यांच्या अपिलाचा दनका नंतर पांढरकवडा APMC चा तपासणी अहवाल प्राप्त झाला आहे. अहवालात गंभीर ठपके ठेवण्यात आले आहे

तपासनीच्या दरम्यान निदर्शनास आलेल्या वस्तुस्थिति बाबत अभिप्राय : हमी दरापेक्षा शेतमालाची कमी दराने विक्री होत आहे. शेतकऱ्यां करीताचे स्वच्छता गृहाची पाहणी केली असता नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले.

बाजार समिति यार्ड मध्ये ऑक्शन शेड व्यापाऱ्यांनी खरेदी केलेला शेतमाल ठेवण्यात आलेला आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी विक्री करीता आणलेला शेतमाल ठेवण्या करीता जागा अपुरी पड़त आहे. व्यापाऱ्यांनी शेतमालची खरेदी केल्यानंतर 24 तासाच्या आत शेतमाल बाजार समिति मधून नेन्याबाबत सूचना देण्यात यावा. शेतमालाचे दैनिक भाव बाजार समीतीचे दर्शनी भागात प्रसिद्ध करण्यात येत नाही.बाजार समिति च्या आवारात स्वच्छता नियमित होत असल्याचे निदर्शनास आले नाही.ऑक्शन शेडचे टिन उडून गेल्याचे तपासणी वेळी निदर्शनास आले. अश्या गंभीर ठापके पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समिति भेट देणाऱ्या नाव : रेवैयाह डोंगरे, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी केळापुर,राजेन्द्र इंगळे तहसीलदार केळापुर, ए. एम. डेहणकर,सहाय्यक निबंधक ,सहकारी संस्था पांढरकवडा. या सर्व अधिकाऱ्यांनी

दिनांक ९/जून/२०२६ रोजी तपासणी करीता आले होते. तर रजनीकांत डालूरामजी बोरेले यांनी



१०/जून/२०२६ ला तपासणी अहवाल मीळण्या करिता माहितीचा अर्ज दाखल केला होता.महत्वाची बाब म्हणजे रजनीकांत डालूरामजी बोरेले हे एकमेव अपक्ष संचालक म्हणुन निवळून आले

कृषी उत्पन्न बाजार समिति मध्ये 18, संचालक निवळून आले होते भाजपा प्रणीत पैणल १८, उमेदवार पैकी एक ही जागा निवळून आणता आले नाही. (खाता पण उघडता आले नाही ) तर एकनाथ शिंदे उपमुख्य मंत्री यांची शिवसेना आणि कॉंग्रेस प्रणीत युती पैनल चे १८, उमेदवार पैकी १७, उमेदवार निवळून आले होते,भाजपा, शिव सेना, कॉंग्रेस या सर्व पक्ष प्रणीत पैनल यांना रजनीकांत डालूरामजी बोरेले ह्या अपक्ष उमेदवार चा निवळनुक मध्ये पराभाव करता आले नाही हे विषय सध्या एकनाथ शिंदे शिव सेनाचा सभापती विनोद जनार्धनराव डंभारे आहेत तर सचिव, सुरेश विठ्ठलराव खांदनकर आहे रजनीकांत बोरेले यांनी कृषी उत्पन्न बाजार समिति च्या ३,कोटी ७२,लक्ष रूपयांच्या नित्कृष्ट दर्जा च्या बांधकामाची पुराव्या निशि तक्रार आणि ऑक्शन टिन शेड उडून गेले त्या बाबत हलगर्जी तक्रार, काही अधिकारी,कर्मचारी यांनी वेतन उचलतांना घर असतांना घर भाड़े जोडून वेतन घेतल्या बाबत गंभीर तक्रार, सभेची प्रोसिडिंग सभेटच लिहून बंद करने व प्रोसिडिंगची प्रत नियमानुसार दिली जात नाही बाबत तक्रार, सभा गृहात व सचिव च्या कार्यालय सी.सी टी वी. कैमेरे लावणे बाबत तक्रार, या शिवाय इत्यादी अनियमितता बाबत राज्य शासना कडे तक्रार केली आहे परंतु शासन अपक्ष संचालक रजनीकांत बोरेले यांच्या पुराव्यानिशि केलेल्या तक्रार कडे दुरक्ष करुण अनियमितता व बांधकाम गैर प्रकार करणाऱ्या जे कोणी दोषी अधिकारी / पाधिकारीआणि बांधकाम ठेकेदार आहे यांना अभय देत असल्याचे म्हटले जातआहे.विशेष बाब म्हणजे कृषी उत्त्पन्न बाजार समिति मध्ये पाच ते सहा (स्थायी व अस्थाई) मिळून आहे तरी बाजार समितीचे आवारात स्वच्छता नियमित होत नसल्याची बाब पुढे आली आहे. इतके शिफ़ाई असतांना त्यांच्या कडून दैनंदिन कौणते काम करुण घेण्यात येत आहे आणि इतके शिपाई आहे ते दैनंदिन नुसार मासिक काम कोणते व किती करीत आहे.आणि A.P.M.C.चा किती निधि पगारच्या स्वरुपात जात आहे हा प्रशन उभा झाला आहे.व पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समिति च्या चौकशी करीता जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार दिनांक 9 जून 2026 रोजी उपविभागीय अधिकारी डोंगरे,

तहसीलदार राजेन्द्र इंगले यांचे सह इत्यादी अधिकारी आणि कर्मचारी यांचा तापस पथक आला होता.वर उल्लेखित अधिकारी यांनी कोणती चौकशी केली आहे आणि जिल्हाधिकार यवतमाळ यांच्या कडे सादर केलेल्या संपूर्ण चौकशी अहवाला ची माहिती देणे आणि जिल्हाधिकारी यांच्या आदेश पत्र नुसार चौकशी डोंगरे उपविभागीय अधिकार केळापुर यांनी केली आहे त्या आदेश पत्राची प्रत देने अशी मागणी माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत रजनीकांत बोरेले यांनी दिनांक 10/जून/2026 रोजी मागितली होती.परंतु माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही.त्यामुळे माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी विरुद्ध प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार केळापुर यांच्या कडे प्रथम अपील दि,14/जुलाई/2026 ला दाखल केला.रजनीकांत बोरेले यांच्याअपील प्रकरणात दिनांक 24/जुलाई/2026 रोजी सुनावनी ठेवण्यात आली.सुनावनीच्या वेळी माहिती अधिकार कार्यकर्ते रजनीकांत डालूरामजी बोरेले हे हजर झाले आणि मौखिक रित्या युक्तिवाद केला आणि लेखी युक्तिवाद दाखल केला. आणि नियमानुसार प्रस्तुत अपील प्रकरणात आदेश पारित करण्यात यावी आणि निःशुल्क माहिती पुविन्याचे आदेश माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी यांना आदेश पारीत करुण आदेशाची प्रत अपीलार्थी रजनीकांत बोरेले यांना देण्यात यावी.असा युक्तिवाद केला यावेळी माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी यांचा शुद्धा युक्तिवाद झाला.

रजनीकांत डालूरामजी बोरेले आणि माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी या दोघांचे युक्तिवाद आईकन्यात आला. तदनंतर राजेंद्र इंगळे तहसीलदार तथा प्रथम अपिलिय प्राधिकारी तहसील कार्यालय केळापुर यांनी अपीलार्थी रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा अपीली अर्ज मान्य केले आणि 15, दिवसाच्या आत निःशुल्क माहिती पुरविन्याचे फर्मान माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी तहसील कार्यालय केळापुर यांना दिनांक 27/जुलाई/2026 रोजी दिले आहे. महत्वाची बाब म्हणजे रजनीकांत बोरेले हे कृषी उत्पन्न बाजार समिति,पांढरकवडा येथे एकटेच अपक्ष संचालक म्हणुन निवळून आले आहे. बोरेले यांनीअनेक विषयी वर तक्रार केल्याची चर्चा आहे कृषी उत्पन्न बाजार समिति बाबत चौकशी अहवालात काय नमूद आहे या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे हे विशेष

## महावितरण च्या हलगर्जीपणामुळे कुपटी येथे चालू लाईनचे चार वायर तुटून पडल्यामुळे मोठा अनर्थ टळला



**दैनिक युवक आधार:**
**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी:सय्यद ईसा** : माहूर तालुक्यातील मौजे कुपटी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेला लागून असलेली तसेच ग्रामपंचायत कार्यालयाला लागून असलेल्या डीपी वरची चालू लाईनीमध्ये डीपी मधून जाणारी चार तारीख तुटून पडल्यामुळे मोठा अनर्थ टळला सुदेवाने त्या ठिकाणी शाळेतील विद्यार्थी व गावातील कोणतीही व्यक्ती नसल्यामुळे मोठी जीवित हानी टळली वायर तुटून पडलेले कळताच गावचे युवा सरपंच प्रफुल भुसारे यांनी येऊन महावितरणच्या कर्मचाऱ्यांना फोनवर सांगितले व त्वरित लाईट बंद करण्यात आले, नाहीतर या ठिकाणी अनुचित प्रकार घडल्याशिवाय राहत नव्हता एवढेच मात्र खरे,

या परिसरामध्ये सतत डीपी मधून जाणारे सप्लाय वायर तुटत असल्याने याकडे महावितरणचे कर्मचारी वरिष्ठ कर्मचारी यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत, कुपटी परिसरामधील गावातील पूर्ण डीपी वरील फ्युज नसून डीपी मधून येणाऱ्या सप्लायलाच वायर जोडून दिल्यामुळे हा प्रकार घडत आहे, यामुळे कोणाची जीवित हानी झाली तर याला जबाबदार महावितरणचे वरिष्ठ कर्मचारी व कनिष्ठ कर्मचारी हे राहतील असा सवाल कुपटी येथील गावकरी उपस्थित करत आहेत, जिल्हा परिषद च्या विद्यार्थ्यांनी ज्या ठिकाणी वायर तुटलेले आहेत त्या ठिकाणी महावितरण चा जाहीर निषेध केला आहे, हा रस्ता गावातील मुख्य असल्यामुळे व या ठिकाणी लागून असलेली जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी व ग्रामपंचायत कार्यालय येथे कामानिमित्त येणारे गावकरी यामुळे या ठिकाणी नेहमी वर्दळ असतो. सुदैवाने वायर तुटलेल्या ठिकाणी कोणी नसल्यामुळे मोठी दुर्घटना टळली असे म्हणावे हरकत नाही, कुपटी येथील पूर्ण गावांमधील सप्लाय होणारी तारा ही लोमकळीस आली असून या ठिकाणीही तारा काढून दुसरे नवीन बसवावी अशी गावकऱ्यांची मागणी आहे, जवळपास ५० वर्षापासून तेच तारा असल्यामुळे हे तार आता जीर्ण होत आहे, त्यामुळे हा प्रकार घडत आहे, पूर्ण गावांमधील नवीन तार बसवावी नाही बसविल्यास येत्या १५ ऑगस्ट ला गावातील युवा सरपंच यांच्या नेतृत्वात माहूरच्या महावितरण कार्यालया येथे भव्य असा मोर्चा काढू असे सांगितले आहे.

## आंबेडकर नगर येथे आरक्षण उपवर्गीकरण अबकड विरोधी विराट महामोर्चाच्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय चिंतन बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : प्रकाश गवारे** : आंबेडकर चळवळीचे युवा नेते "गब्बर सोनवणे" आयोजित आंबेडकर नगर येथे आरक्षण अबकड उपवर्गीकरण विरोधी नांदेड विराट महामोर्चाच्या पार्श्वभूमीवर भव्य जिल्हास्तरीय चिंतन बैठक संपन्न आंबेडकरी चळवळीतील युवा नेतृत्व म्हणून ओळख असलेले "गब्बर सोनवणे" यांच्या पुढाकारातून आगामी ९ ऑगस्ट रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या आरक्षण उपवर्गीकरण (अबकड) विरोधी विराट महामोर्चाच्या पार्श्वभूमीवर आंबेडकर नगर येथे भव्य जिल्हास्तरीय चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटना, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, ज्येष्ठ मार्गदर्शक, धर्मगुरू, विद्यार्थी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या चिंतन बैठकीमध्ये मला देखील माझे विचार मांडण्याची संधी लाभली. संविधान, सामाजिक न्याय आणि आरक्षणाच्या मूलभूत तत्त्वांवर आधारित माझे मत उपस्थितांसमोर मांडताना समाजातील एकजूट, बंधुता आणि घटनात्मक मूल्ये जपण्याचे आवाहन करण्यात आले.



या बैठकीस आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा कृती समितीचे सर्व सदस्य, धर्मगुरू भदंत पैंय्याबोधी थेरो, आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते तथा रिपब्लिकन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा सोनाळे, विविध पुरस्कारांनी सन्मानित आंबेडकरी चळवळीचे मार्गदर्शक प्रभू सावंत सर, बैठकीचे अध्यक्ष तथा बहुजन संघर्ष सेना संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर, युवा नेते राहुल भाऊ चिखलीकर, प्रा. अविनाश नाईक सर, गब्बर सोनवणे मित्रपरिवार, प्रशांत गोडबोले, समिंदर वाघमारे, अशोक पंडित तसेच आंबेडकर नगर परिसरातील असंख्य ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीमध्ये आगामी ९ ऑगस्ट रोजी नांदेड येथे होणाऱ्या विराट महामोर्चाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मोर्चाचे नियोजन, जनजागृती, संघटनात्मक तयारी आणि समाजातील सर्व घटकांचा व्यापक सहभाग यावर विविध मान्यवरांनी आपले विचार मांडले. उपस्थितांनी हा महामोर्चा शांततापूर्ण, संविधानिक आणि लोकशाही मार्गाने यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी वक्त्यांनी स्पष्ट केले की, हा महामोर्चा कोणत्याही जाती, धर्म किंवा व्यक्तीविरोधात नसून आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाला विरोध नोंदविण्यासाठी आणि संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी आयोजित करण्यात आला आहे. समाजात तेढ निर्माण करणाऱ्या आणि सामाजिक ऐक्याला बाधा पोहोचविणाऱ्या धोरणांविरोधात लोकशाही पद्धतीने आवाज उठविणे हा या आंदोलनाचा मुख्य उद्देश असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.वक्त्यांनी असा आरोप केला की, समाजात संभ्रम निर्माण करून विविध घटकांमध्ये मतभेद वाढविण्याचा प्रयत्न होत आहे. अशा परिस्थितीत संविधानिक मूल्ये, सामाजिक सलोखा आणि सामाजिक न्याय यांचे रक्षण करण्यासाठी सर्व समाजघटकांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेला ९ ऑगस्टचा नांदेड येथील आरक्षण उपवर्गीकरण विरोधी विराट महामोर्चा ऐतिहासिक ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. राज्यभरातील आंबेडकरी, बहुजन आणि संविधानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने या महामोर्चात सहभागी होण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

बैठकीचा समारोप धर्मगुरू भदंत पैंयांबोधी थेरो यांच्या आशीर्वाद गाथेने व सामाजिक ऐक्याचा संदेश आणि आगामी महामोर्चा यशस्वी करण्याच्या सामूहिक निर्धाराने उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

# रेबीजच्या इंजेक्शनची सुईच चिमुकल्याच्या शरीरात; केडीएमसीच्या रुग्णालयातील धक्कादायक निष्काळजीपणा उघड

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा** : सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी आणि सुरक्षित आरोग्यसेवा देण्याचा दावा करणाऱ्या पालिका रुग्णालयांतील भोंगळ कारभाराचा आणखी एक संतापजनक नमुना कल्याणमध्ये समोर आला आहे. भटक्या कुत्र्याने चावा घेतलेल्या अडीच वर्षीय चिमुकल्याला रेबीजचे इंजेक्शन देताना सुईच त्याच्या शरीरात तुटून राहिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मुलाला असह्य वेदना सुरू झाल्यानंतर करण्यात आलेल्या एक्स-रे तपासणीत कमरेत सुई अडकून असल्याचे स्पष्ट झाले. अखेर खासगी रुग्णालयात शस्त्रक्रिया करून ती सुई बाहेर काढण्यात आली. या घटनेमुळे केडीएमसीच्या आरोग्य यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

कल्याण पूर्वेतील काका ढाबा परिसरात राहणारा अडीच वर्षीय कावेश पांडे याला काही दिवसांपूर्वी भटक्या कुत्र्याने चावा घेतला होता. त्यानंतर त्याला उपचारासाठी केडीएमसीच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात नेण्यात आले. तेथे रेबीज प्रतिबंधक इंजेक्शन देण्यात आले. मात्र इंजेक्शन दिल्यानंतर सुई बाहेर आली नसल्याची बाब कुटुंबीयांच्या लक्षात आली. त्यांनी तत्काळ वैद्यकीय कर्मचाऱ्यांना याची माहिती दिली. मात्र संबंधितांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करत "सुई कुठेतरी पडली असेल" असे सांगून कुटुंबीयांची बोळवण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, घरी परतल्यानंतर कावेशला तीव्र वेदना आणि अस्वस्थता जाणवू लागली. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी विविध रुग्णालयांचे दरवाजे ठोठावले. अखेर करण्यात आलेल्या एक्स-रे तपासणीत सुई मुलाच्या कमरेत खोलवर अडकून असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर एका खासगी रुग्णालयात तातडीने शस्त्रक्रिया करून सुई बाहेर काढण्यात आली. वेळेत निदान झाले नसते तर या निष्काळजीपणाचे परिणाम आणखी गंभीर होऊ शकले असते, अशी चर्चा वैद्यकीय वर्तुळात सुरू आहे.

कावेशची आई काजल पांडे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना रुग्णालय प्रशासनावर संताप व्यक्त केला. "आम्ही डॉक्टरांना वारंवार सुई दिसत नसल्याचे सांगितले, पण आमचे म्हणणे गांभीर्याने घेतले गेले नाही. आमच्या मुलाला वेदना होत असताना आम्हाला घरी पाठवण्यात आले. एका निष्काळजीपणामुळे आमच्या मुलाला शस्त्रक्रिया करावी लागली," अशी खंत त्यांनी व्यक्त केली.




या घटनेनंतर मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ला यांनी चौकशीचे आदेश दिले असून संबंधित प्रकरणात इंटर्न डॉक्टर किंवा इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता का, याचीही तपासणी केली जाणार असल्याचे सांगितले आहे. मात्र चौकशीचे आदेश देऊन प्रशासनाची जबाबदारी संपते का, असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.

आरोग्य व्यवस्थेतील बेफिकिरीचा कळस?

सरकारी आणि पालिका रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणारे रुग्ण हे प्रामुख्याने सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असतात. अशा ठिकाणी उपचाराऐवजी जीवाशी खेळणारे प्रकार घडत असतील, तर नागरिकांनी विश्वास ठेवायचा कुणावर, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एका अडीच वर्षांच्या निष्पाप बालकाच्या शरीरात इंजेक्शनची सुई राहणे ही केवळ चूक नसून वैद्यकीय निष्काळजीपणाची अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे.

*दोषींवर कारवाई होणार की चौकशी फाईलमध्येच?*

राज्यातील विविध शासकीय आणि पालिका रुग्णालयांमध्ये वारंवार निष्काळजीपणाच्या घटना समोर येत असतानाही जबाबदारांवर कठोर कारवाई झाल्याची उदाहरणे दुर्मिळ आहेत. त्यामुळे या प्रकरणातही चौकशीचा गाजावाजा होऊन प्रकरण थंडबस्त्यात जाणार की दोषींवर प्रत्यक्ष कारवाई होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

एका निष्पाप चिमुकल्याच्या वेदनांनी आरोग्य व्यवस्थेतील विदारक वास्तव पुन्हा एकदा समोर आणले आहे. शासन आणि स्थानिक प्रशासनाने या घटनेकडे केवळ चौकशीचा विषय म्हणून न पाहता संपूर्ण यंत्रणेचे आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# करण धोंगडे यांच्या नेतृत्वाखाली 'ऑपरेशन अकरावी प्रवेश'; कथित प्रवेश अनियमिततेचा पत्रकार संघ करणार पर्दाफाश!

## मालेगाव तालुक्यातील अकरावी व बारावी प्रवेश प्रक्रियेतील कथित अतिरिक्त शुल्काबाबत पालक-विद्यार्थ्यांकडून पुरावे संकलित होणार

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही पालक व विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त रक्कम आकारण्यात आल्याच्या तक्रारी व चर्चा समोर येत असल्याने निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ या संपूर्ण प्रकरणाची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करण्यासाठी पुढाकार घेणार आहे. संघाचे जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांच्या नेतृत्वाखाली लवकरच विशेष बैठक होणार असून, त्यामध्ये मालेगाव तालुक्यातील अकरावी प्रवेश प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.

या बैठकीला संघाचे वाशीम जिल्हा सचिव प्रताप नागरे, मालेगाव तालुका अध्यक्ष प्रकाश भुरे, रिसोड तालुका अध्यक्ष रणजीत सिंह ठाकुर, रिसोड ग्रामीण तालुकाध्यक्ष गोपाल बोरकर पाटील, मंगरूळपीर तालुका अध्यक्ष सुनील राठोड, कारंजा लाड तालुका अध्यक्ष अंकुश मुंदे तसेच मानोरा तालुका अध्यक्ष संतोष आढाव हे उपस्थित राहून तालुकानिहाय माहिती मांडणार असल्याची माहिती संघाकडून देण्यात आली आहे. संघाकडे काही पालक व विद्यार्थ्यांकडून अशी माहिती येत असल्याचे सांगितले जात आहे की, काही विद्यार्थ्यांना स्थानिक किंवा पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्यासाठी, तसेच काही प्रकरणांत कमी गुण असतानाही इच्छित महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली ५,५०० रुपये, ११,००० रुपये व १७,००० रुपयांपर्यंत अतिरिक्त रक्कम मागितल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तसेच, काही विद्यार्थ्यांना चांगले गुण असूनही पसंतीच्या






महाविद्यालयात प्रवेशासाठी अतिरिक्त रक्कम मागण्यात आल्याचीही चर्चा पालकांमध्ये आहे. या सर्व बाबींची सत्यता पुराव्यांच्या आधारे पडताळण्याचा निर्णय बैठकीत घेतला जाणार आहे.

तसेच, काही पालक व विद्यार्थ्यांकडून बारावीच्या काही विद्यार्थ्यांकडून सुमारे ३,००० रुपये आकारण्याबाबतही चर्चा सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. काही विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना रक्कम आणण्यास सांगण्यात आले; मात्र ती नेमक्या कोणत्या शुल्कासाठी आहे, याची स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. संबंधित शुल्काची अधिकृत पावती देण्यात आली का, याचीही माहिती संकलित करण्यात येणार आहे.

बैठकीपूर्वी संघाचे तालुका पदाधिकारी मालेगाव तालुक्यातील विविध कनिष्ठ महाविद्यालयांमधील पालक, विद्यार्थी व उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे माहिती संकलित करणार आहेत. कोणत्या महाविद्यालयात शासनमान्य शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम मागितल्याच्या तक्रारी आहेत, त्याबाबत पावत्या देण्यात आल्या का, तसेच उपलब्ध पुरावे काय आहेत, याची पडताळणी करण्यात येणार आहे. पुराव्यांच्या आधारेच पुढील भूमिका निश्चित केली जाणार आहे.

बैठकीनंतर प्राप्त माहितीचा आढावा घेऊन संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन देण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. आवश्यकता भासल्यास निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय गणेशजी कचकलवार यांच्या उपस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्यांसह राज्याच्या शिक्षणमंत्र्यांचीही भेट घेण्याबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे.

संघाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे की, कोणत्याही महाविद्यालयाची किंवा शैक्षणिक संस्थेची विनाकारण बदनामी करणे अथवा कोणालाही लक्ष्य करणे हा या उपक्रमाचा उद्देश नाही. प्रत्येक तक्रारीची वस्तुनिष्ठ पडताळणी करून, उपलब्ध पुरावे, कागदपत्रे आणि संबंधितांची बाजू जाणून घेतल्यानंतरच पुढील भूमिका निश्चित केली जाईल. त्यामुळे कोणत्याही संस्थेवर अन्याय होणार नाही, याची पूर्ण दक्षता घेतली जाणार आहे. मात्र चौकशीत नियमबाह्य प्रकार किंवा आर्थिक अनियमितता सिद्ध झाल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर व प्रशासकीय कारवाईची मागणी करण्यासाठी संघ ठामपणे पाठपुरावा करणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

> 'मुलांनी घरी येऊन तीन हजार रुपये आणण्यास सांगितले. आम्ही विचारले, 'ही रक्कम कशासाठी आहे?' तर मुलांनी सांगितले, 'आम्हाला माहिती नाही; सरांनी फक्त तीन हजार रुपये आणायला सांगितले आहे.' त्यामुळे ही रक्कम नेमकी कोणत्या शुल्कासाठी आहे, शासनमान्य आहे का आणि त्याबाबत अधिकृत पावती दिली जाते का, याची स्पष्टता होणे गरजेचे आहे.'
>
> — पालक
>
> 'आम्हाला तीन हजार रुपये आणायला सांगितले. पण ही रक्कम कोणत्या शुल्कासाठी आहे, याची माहिती आम्हाला देण्यात आलेली नाही. शिक्षकांनी फक्त पैसे आणण्यास सांगितले, एवढेच आम्हाला माहीत आहे.'
>
> — विद्यार्थी

# पालखेड मंडळातील हवामान केंद्राची दयनीय अवस्था; पीक विम्याच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : खरीप हंगामाला सुरुवात झाल्याने राज्यभरात प्रधानमंत्री फसल विमा योजनेअंतर्गत पीक विमा नोंदणीला वेग आला आहे. आगामी काळात द्राक्षबागांच्या बहार छाटणीचा हंगाम सुरू होणार असल्याने कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना पीक विमा काढण्याचे आवाहन केले जात आहे. मात्र, पीक नुकसानीचे मूल्यमापन करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पालखेड मंडळातील स्वयंचलित हवामान केंद्राची अत्यंत दयनीय अवस्था समोर आल्याने पीक विमा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कारसुळ (ता. निफाड) येथील शेतकरी तथा कृषी मित्र निलेश ताकाटे आणि भाऊसाहेब उगले यांनी पालखेड मंडळातील हवामान केंद्राची प्रत्यक्ष पाहणी केली असता केंद्र परिसर झाडाझुडपांनी पूर्णपणे वेढलेला असल्याचे निदर्शनास आले. पर्जन्यमापक (रेन गेज) यंत्रावर झाडांच्या फांद्या पसरल्या असून परिसराची स्वच्छता व देखभाल दीर्घकाळापासून झालेली नसल्याचे स्पष्ट दिसून आले. पाहणीदरम्यान केंद्रावर कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नसल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या मते, हवामान केंद्रावर नोंदविण्यात येणाऱ्या पर्जन्यमान, तापमान व इतर हवामानविषयक आकडेवारीच्या आधारे अनेकदा पीक विमा दावे, नैसर्गिक आपत्तीचे मूल्यमापन आणि नुकसानभरपाई निश्चित केली जाते. अशा स्थितीत केंद्राची यंत्रणाच कार्यक्षम नसल्यास प्रत्यक्ष परिस्थिती आणि अधिकृत नोंदी यामध्ये तफावत निर्माण होण्याची शक्यता असून त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसू शकतो.

गेल्या काही वर्षांत अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि गारपिटीमुळे परिसरातील द्राक्षबागा व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पंचनामे होऊनही हवामान केंद्रांच्या नोंदी प्रत्यक्ष परिस्थितीशी जुळत नसल्याने अनेक शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहिल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

शासन पीक विमा योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करत असून शेतकऱ्यांनाही विमा काढण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. मात्र, नुकसानाच्या मूल्यमापनासाठी आवश्यक असलेली हवामान केंद्रेच दुर्लक्षित राहिल्यास संपूर्ण पीक विमा प्रक्रियेवरच संशय निर्माण होतो. त्यामुळे हवामान केंद्रांची नियमित देखभाल, यंत्रसामग्रीची तपासणी आणि अचूक हवामान नोंदी सुनिश्चित करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

**देखभालीअभावी पर्जन्यमापक झाडाझुडपांत गाडला; शेतकऱ्यांचा संताप, तातडीच्या दुरुस्तीची मागणी**

> 'तातडीने संयुक्त पाहणी करून दुरुस्ती करावी'
> पालखेड मंडळातील स्वयंचलित हवामान केंद्राची कृषी, महसूल व संबंधित विभागांनी तातडीने संयुक्त पाहणी करून आवश्यक दुरुस्ती, नियमित स्वच्छता आणि देखभाल करावी. केंद्रातील पर्जन्यमान व इतर हवामानविषयक नोंदी पारदर्शक आणि अचूक पद्धतीने होत असल्याची खात्री प्रशासनाने शेतकऱ्यांना द्यावी. अन्यथा लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन, जनआंदोलन आणि आवश्यक असल्यास आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.
>
> — देवेंद्र काजळे
> सामाजिक कार्यकर्ते तथा माजी उपसरपंच

> अचूक हवामान नोंदीशिवाय शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही'
> 'गेल्या अनेक वर्षांपासून अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि गारपिटीमुळे परिसरातील द्राक्षबागा व इतर शेतीपिकांचे मोठे नुकसान होत आहे. अनेक वेळा अधिकृत हवामान नोंदी आणि प्रत्यक्ष परिस्थितीमध्ये तफावत आढळते. त्यामुळे नुकसान होऊनही अनेक शेतकरी पीक विमा भरपाईपासून वंचित राहतात. शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी हवामान केंद्रांच्या अचूक नोंदी, प्रभावी पंचनामे आणि पारदर्शक पीक विमा प्रक्रिया अत्यावश्यक आहे.'
>
> — निलेश ताकाटे
> कृषी मित्र, महाराष्ट्र शासन, कारसुळ

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे ठोस मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे** : हिंगोली लोकसभा मतदारसंघातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी खासदार नागेश (बापूराव) पाटील आष्टीकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन महत्त्वपूर्ण निवेदन सादर केले. या भेटीत आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार निवासी शिक्षण, शैक्षणिक सुविधा आणि आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी ठोस मागणी त्यांनी केली.

खासदार पाटील आष्टीकर यांनी निवेदनात हिंगोली लोकसभा मतदारसंघातील आदिवासी भागांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून दिले. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा, वसतिगृहे, गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था, शिष्यवृत्ती योजना आणि इतर शैक्षणिक सुविधांचा विस्तार करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

यावेळी त्यांनी आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये आणि त्यांना स्पर्धात्मक व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी केंद्र सरकारने विशेष योजना राबवाव्यात, अशी मागणी केली. आदिवासी



समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार निवासी शिक्षण मिळणे ही काळाची गरज असून, या विषयात तातडीने सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा त्यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांकडे व्यक्त केली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित बाबींचा विचार करण्याचे आश्वासन दिल्याचे समजते. खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या या पुढाकारामुळे हिंगोली लोकसभा मतदारसंघातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांना राष्ट्रीय स्तरावर महत्त्व प्राप्त झाल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# सिल्लोड तहसील कार्यालयाचे स्थलांतर रद्द करा; अन्यथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जनआंदोलन छेडणार

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) सिल्लोड तालुक्याच्या वतीने राज्य शासनाकडे जोरदार मागणी करण्यात आली आहे की, सिल्लोड शहराच्या मध्यवस्तीत, बसस्थानक व पंचायत समितीच्या शेजारी असलेले तहसील कार्यालय कोणत्याही परिस्थितीत स्थलांतरित करू नये. तालुकाप्रमुख मा. रघुनाथ घरमोडे यांच्या नेतृत्वाखाली शासनाला याबाबत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे.

सिल्लोड तहसील कार्यालय हे तालुक्यातील ग्रामीण भागातून येणाऱ्या हजारो शेतकरी, कष्टकरी, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत सोयीच्या ठिकाणी आहे. महसूल विभागाशी संबंधित बहुतांश कामांसाठी नागरिकांना एकाच कामाकरिता अनेक वेळा तहसील कार्यालयात जावे लागते. अशा परिस्थितीत तहसील कार्यालय दूरस्थ ठिकाणी हलविणे म्हणजे सर्वसामान्य जनतेवर अन्यायकारक आर्थिक व मानसिक भार लादण्यासारखे आहे.

राज्य शासनाने प्रशासन लोकाभिमुख करण्याऐवजी नागरिकांना अतिरिक्त खर्च व गैरसोय होईल असा निर्णय घेणे हे लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला धरून नाही. भारतीय राज्यघटनेतील समानता,



> **महत्त्वाची मागणी**
> नव्याने उभारण्यात आलेल्या इमारतीचा उपयोग रजिस्ट्री कार्यालय, कृषी विभाग, वन विभाग तसेच सध्या खाजगी जागेत भाडेतत्त्वावर सुरू असलेल्या इतर शासकीय कार्यालयांसाठी करण्यात यावा. त्यामुळे शासनाचा भाडेखर्चही वाचेल आणि शासकीय मालमत्तेचा योग्य उपयोग होईल.

न्याय व सुलभ प्रशासनाच्या तत्त्वांचा विचार करून हा निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) स्पष्टपणे इशारा देत आहे की, नागरिकांच्या भावनांचा अनादर करून तहसील कार्यालय स्थलांतरित करण्याचा निर्णय कायम ठेवला, तर सिल्लोड तालुक्यात तीव्र लोकशाही मार्गाने जनआंदोलन, धरणे, मोर्चे आणि व्यापक लोकसहभागातून संघर्ष उभारला जाईल. या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील.

निवेदन देताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे, ज्येष्ठ नेते रघुनाथ चव्हाण, शहर प्रमुख मच्छिंद्र घाडगे, प्रसिद्धीप्रमुख दशरथ सुरडकर, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश वराडे, उप तालुकाप्रमुख रामेश्वर काळे, ज्येष्ठ नेते संजय कळात्रे, युवासेना शहर अधिकारी रामेश्वर ऐंडोले, महेंद्र बावस्कर, सोमनाथ बडक, विठ्ठल खिल्लारे, विभागप्रमुख गजानन जयस्वाल, सखाराम हिवाळे, बाबुराव खंबाट, पंकज कांबळे, सुनील सोनवणे, प्रवीण पंडित इंगळे, मिलिंद देहाडे, संजय बी. आर. के., तुकाराम खळतकर, सीताराम शिंदे, गजानन कळूबा जाधव, लक्ष्मण जाधव, समाधान जाधव, सचिन साळवे, पंढरीनाथ म्हसके आदी शिवसेना पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# प्रवेशद्वार कमानीवरून वाद

## चौघांचे माहूर तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू

**दैनिक युवक आधार:**
**श्रीक्षेत्र माहूर: प्रतिनिधी/सय्यद ईसा** : माहूर तालुक्यातील मौजे लिंबायत येथे मालवाडा हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र 161A ला लागून उभारलेल्या वीर शिरोमणी महाराणा प्रताप प्रवेशद्वार या कमानीच्या उभारणीवरून वाद निर्माण झाला असून या कमानीवर छत्रपती शिवाजी महाराज वीर शिरोमणी महाराणा प्रताप व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर असे नवीन नाव देत प्रवेशद्वाराचे नूतनीकरण करावे किंवा ग्रामपंचायत लिंबायत असे नाव द्यावे किंवा सदरील प्रवेशद्वार अनधिकृत असल्यास शासनाने ती जागा मोकळी करावी यासाठी माहूरच्या तहसील कार्यालयासमोर दि 4 रोजी पासून चौघा जणांनी भर पावसात आमरण उपोषण सुरू केले असून तहसीलदार आणि जिल्हा परिषद बांधकाम विभाग यावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

उपोषणकर्त्यांनी निवेदनात नमूद केल्याप्रमाणे मौजे लिंबायत ता. माहुर जि. नांदेड येथे गावामध्ये जाण्याऱ्या जिल्हा परिषद रोडच्या हद्दी मध्ये येणाऱ्या रोडवर विना परवानगी कमानीचे बांधकाम करण्यात आले असून त्या बाबत ग्रामपंचायतचा दि. 02-03-2014 च्या जाली ठरावाच्या आधारे ही कमान उभारण्यात आली असून या कमानीवर विर शिरोमनी महाराणा प्रताप




प्रवेश व्दार असे लिहीले गेले आहे. या ठरावाची ग्रामपंचायतला नोंद नाही व संबधीत विभागाची किंवा जिल्हाधिकारी नांदेड यांची कुठलीही परवानगी नसून बेकायदेशीररित्या बांधण्यात आलेल्या या कमानीवर वरील नाव न लिहीता गावामध्ये सर्व जाती धर्माचे लोक राहत असल्यामुळे आमची मागणी आहे की ससदरील कमानीवर छत्रपती शिवाजी महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर विर शिरोमनी महाराणा प्रताप व श्री विश्वकर्मा प्रवेश व्दार असे लिहण्यात यावे किंवा ग्रामपंचायत कार्यालय लिंबायत सहर्ष स्वागत सादर करीत आहे. असे लिहण्यात यावे प्रशासनास विषय वादग्रस्त वाटत असल्यास वरील विषयाचा विचार करून सदरील शासनाची जागा मोकळी करून घ्यावे. अन्यथा त्याचा दिवशी म्हणजे 04-08-2026 रोजी वरील मागण्या मान्य न झाल्यास प्रविण भिमराव बरडे विजय सुदाम जाधव राहुल गौतम बेंगाळे गजानन किसन मोरे या कार्यकर्तायासह सर्वजन माहुर तहसिल कार्यालया समोर आमरण उपोषणास बसणार आहोत आमच्या जीवाचे काही बरेवाईट झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासन व संबधीत विभागाची राहील असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे निवेदनाच्या प्रति सर्व संबंधितांना पाठविण्यात आल्याने दखल झाली नसल्याने उपोषण सुरू करण्यात आले आहे

गावातील काही नागरिकाकडून महापुरुषाबद्दल दुजाभाव करण्यात येत असल्याने संतप्त भावनेतून उपोषण सुरू करण्यात आले असून प्रशासनाने वेळेत दाखल न घेतल्यास उपोषणकर्त्यांचे समर्थक उग्र स्वरूपाचे आंदोलन करतील असा इशारा उपोषणकर्ते प्रविण भिमराव बरडे विजय सुदाम जाधव राहुल बेंगाळे गजानन मोरे सर्व राहणार लिंबायत पोस्ट लखमापूर तालुका माहूर जिल्हा नांदेड यांनी दिला आहे.